



# गोदातीर समाचार

संपादक : केशव घोणसे पाटील

www.godateer.com

RNI No.6331/62

REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026






* वर्ष ६५ वे * अंक ३६ * नांदेड * शनिवार, दि. ७ फेब्रुवारी २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# विश्वविजेता भारत! इंग्लंडचा धुव्वा उडवत भारताने सहाव्यांदा कोरलं अंडर-१९ विश्वचषकावर नाव

**मुंबई (प्रतिनिधी)-** हरारेच्या मैदानावर भारताच्या अंडर-१९ संघाने इतिहासाची पुनरावृत्ती केली. आयसीसी पुरुष-१९ वर्षांखालील विश्वचषक २०२६ च्या अंतिम सामन्यात भारताने इंग्लंडवर तब्बल १०० धावांनी दणदणीत विजय साकारत सहाव्यांदा विश्वविजेतेपदावर आपले नाव कोरले.



वैभव सूर्यवंशीच्या विक्रमी आणि वादळी १७५ धावांच्या खेळीमुळे भारताने ४१२ धावांचा डोंगर उभा केला, ज्यापुढे इंग्लंडचा संघ पुरता कोसळला. लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लिश फलंदाज अपयशी ठरले आणि संपूर्ण संघ ३११ धावांत गारद झाला. या विजयासह भारताने सहाव्यांदा (२०००, २००८, २०१२, २०१८, २०२२ आणि २०२६) विश्वविजेतेपदाचा चषक उंचावून नवा इतिहास रचला आहे.

भारताच्या डावाची सुरुवात वैभव सूर्यवंशी आणि आरोन जॉर्ज यांनी केली. मात्र सुरुवातीलाच भारताला धक्का बसला. आरोन जॉर्ज अवघ्या ९ धावांवर बाद झाला. त्यानंतर कर्णधार आयुष म्हात्रेने डाव सावरत जबाबदारीने खेळ केला. आयुषने ५१ चेंडूत ७ चौकार आणि २ षटकारांसह ५३ धावांची महत्त्वपूर्ण अर्धशतकी खेळी साकारली.

यानंतर भारताकडून वैभव सूर्यवंशीने अक्षरशः धुमाकूळ घातला. त्याने अवघ्या ३२ चेंडूत अर्धशतक पूर्ण केले आणि ५५ चेंडूत शानदार शतक झळकावले. वैभवने फक्त ७१ चेंडूत १५० धावांचा टप्पा ओलांडत प्रेक्षकांना थक्क केले. अखेर त्याने ८० चेंडूत १५ चौकार आणि १५ षटकारांच्या मदतीने १७५ धावांची अफलातून खेळी केली. या डावात त्याचा स्ट्राईक रेट तब्बल २१८.७५ इतका होता.

वैभव बाद झाल्यानंतर भारतीय डावाचा वेग काहीसा मंदावला. त्यानंतर विहान मल्होत्राने ३६ चेंडूत २ चौकारांसह ३० धावा करत योगदान दिले. वेदांत त्रिवेदीनेही ३६ चेंडूत ३ चौकारांसह ३२ धावांची उपयुक्त खेळी केली. अभिज्ञान कुंडूने आक्रमक खेळ करत ३१ चेंडूत ६ चौकार आणि १ षटकाराच्या मदतीने ४० धावा केल्या. याशिवाय आर. एस. अंबरीशने १८, खिलेन पटेलने ३, हिनेल पटेलने ५ धावा केल्या, तर कनिष्क चौहान नाबाद ३७ धावांवर राहिला. इंग्लंडकडून जेम्स मिंटोने सर्वाधिक ३ विकेट घेतल्या. त्याला एलेक्स ग्रीन आणि सेबस्टियन मॉर्गन यांनी प्रत्येकी २ विकेट घेत चांगली साथ दिली.

४१२ धावांच्या विशाल लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंडची सुरुवात अत्यंत खराब झाली. भारताच्या भेदक गोलंदाजीसमोर इंग्लंडचे फलंदाज ठराविक अंतराने बाद होत गेले. इंग्लंड संघ ४०.२ षटकांत ३११ धावांवर गारद झाला. वैभव सूर्यवंशी हा टीम इंडियाचा अंतिम सामन्याचा स्टार होता, त्याने फक्त ८० चेंडूत १७५ धावा केल्या. दरम्यान, इंग्लंडकडून कॅलेब फॉकनरने शतक झळकावले, परंतु तो आपल्या संघाला विजय मिळवून देऊ शकला नाही. फॉकनरने ६७ चेंडूत ११५ धावा केल्या.

# नांदेडमध्ये कविता मुळे होणार भाजपच्या पहिल्या महापौर तर दीपकसिंह रावत उपमहापौर



**नांदेड (प्रतिनिधी)-** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या भाजपच्या पहिल्या महापौरपदी कविता मुळे यांची निवड निश्चित आहे. तर उपमहापौरपदी दीपकसिंह रावत यांची निवड होणार आहे.

नांदेडमध्ये महापौर आणि उपमहापौर निवडीसाठी शुक्रवारी उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. यात भाजपाकडून महापौरपदासाठी कविता संतोष मुळे यांचा तर उपमहापौरपदासाठी दीपकसिंह रावत यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला आहे. नांदेडमध्ये भाजपला स्पष्ट बहुमत मिळाले असल्याने या दोघांच्या निवडीची आता केवळ औपचारिक घोषणा बाकी आहे.

महापौरपदी निवड निश्चित झालेल्या कविता मुळे या प्रभाग क्रमांक २ तरोडा (बु.) भागातून भारतीय जनता पक्षाच्या तिकिटावर विजयी झालेल्या आहेत. तर उपमहापौरपदी निवड निश्चित झालेले दीपकसिंह रावत हे प्रभाग क्रमांक १६ वजिराबाद/गाडीपुरा या प्रभागातून भारतीय जनता पक्षाचे नगरसेवक आहेत.

येथील महापालिका महापौरपदाची निवड प्रक्रिया प्रशासकीय पातळीवर गुरुवार, दि. ५ फेब्रुवारीपासून सुरु झाली होती. या उमेदवारांचे अर्ज शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी रोजी स्वीकारले. त्यानंतर १० फेब्रुवारी रोजी विशेष सभेत महापौर/उपमहापौर निवडले जाणार आहेत. यावेळी सर्वसाधारण महिला प्रवगार्साठी हे पद राखीव आहे. कविता मुळे महापौरपदी तर दीपकसिंह रावत उपमहापौरपदी यांच्या नावाची घोषणा औपचारिकरित्या १० फेब्रुवारी रोजी होणार आहे.

महापालिकेच्या निवडणुकीत पहिल्यांदाच भारतीय जनता पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले आहे. भाजपने स्वबळावर ४५ जागांवर विजय मिळविला तर शिवसेना शिंदे गटानेही पाठिंबा देत ४ सदस्य भाजपसोबत जोडले आहेत. त्यामुळे भाजप आणि शिवसेना महायुतीची सदस्य संख्या आता ४९ वर पोहोचली आहे. दुसरीकडे महापालिकेत एमआयएमने १४ जागा मिळवत दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष म्हणून स्थान मिळवले आहे. काँग्रेसला १०, वंचित बहुजन आघाडीला ५, राष्ट्रवादी (अजित पवार गट) दोन आणि एका अपक्ष उमेदवारालाही संधी मिळाली आहे.

महापौर निवडण्याची प्रक्रिया प्रशासकीय पातळीवर दि. ५ फेब्रुवारी रोजी सुरू झाली आहे. महापौर, उपमहापौरपदासाठी अनेक इच्छुकांनी अर्ज विकत घेतले आहेत. दि. ६ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत अर्ज दाखल करता येणार होते. महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीतील कै. शंकरराव चव्हाण सभागृहात दि. १० फेब्रुवारी रोजी (पान ३ वर...)

### महापौर आणि उपमहापौर पदासाठी अर्ज दाखल

महापौरपदासाठी भाजपकडून कविता मुळे, एमआयएम पक्षाकडून अश्विनी धोंगडे तर काँग्रेस-वंचितकडून महेजबीन अब्दुल फहीम या तीन जणांनी पाच अर्ज दाखल केले आहेत. तर उपमहापौरपदासाठी एमआयएमकडून सुमय्या अलकेसरी, भाजपकडून दीपकसिंह रावत आणि काँग्रेस-वंचितकडून राहुल सोनसळे यांनी आपले नामनिर्देशन पत्र नगरसचिव अजितपालसिंघ संधू यांच्याकडे दाखल केले आहेत. १० फेब्रुवारी रोजी हात उंचावून मतदान घेण्यात येणार आहे.

## सिक्कीममध्ये जाणवले १३ भूकंपाचे धक्के

**सिक्कीम (प्रतिनिधी)-** सिक्कीमच्या काही भागात १३ भूकंपाचे धक्के जाणवले. गुरुवारी रात्री उशिरा ते शुक्रवार सकाळपर्यंत हे धक्के जाणवले. राज्यातील सहा जिल्ह्यांपैकी चार जिल्ह्यांमध्ये या भूकंपाची नोंद झाली आहे. मंगन, नामची, गंगटोक आणि गेजिंग या जिल्ह्यांमध्ये हे धक्के जाणवले आहे. मिळालेल्या माहितीनुसार या भूकंपांची तीव्रता रिश्टर स्केलवर २.२ ते ४.५ पर्यंत होती. या भूकंपामुळे लोक भीतीने घराबाहेर पडले आणि परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

## राज्यातील १२ जि.प. व १२५ पं.स.साठी आज मतदान

**मुंबई (प्रतिनिधी)-** राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आज, दि. ७ फेब्रुवारी रोजी मतदान होत असून जिल्हा परिषदेच्या ७३१ तर आणि पंचायत समित्यांच्या १ हजार ४६२ जागांसाठी ही निवडणूक होत आहे. एकूण ७ हजार ४३८ इतके उमेदवार निवडणूक रिंगणात असून सर्व मिळून एकूण २ कोटी ८ लाख २० हजार ७०२ इतकी मतदार संख्या आहे.

राज्य निवडणूक आयोगाने रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव आणि लातूर या १२ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांच्या निवडणूक कार्यक्रमाची घोषणा १३ जानेवारी २०२६ रोजी केली होती. त्यानुसार ५ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान होणार होते, परंतु उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे राज्यात तीन दिवसांचा दुखवटा जाहीर झाल्यानंतर मतदानाच्या तारखेत बदल करण्यात आला. त्यानुसार आता दि. ७ फेब्रुवारी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होणार आहे. मतमोजणी ९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता सुरू होईल. त्यानंतर आचारसंहिता संपुष्टात येईल.

सर्व बारा जिल्हा परिषदांच्या एकूण ७३१ जागा असून, त्यातील ३६९ जागा महिलांसाठी राखीव आहेत. अनुसूचित जातींसाठी ८३, अनुसूचित जमातींसाठी २५ आणि नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी १९१ जागा आरक्षित आहेत. जिल्हा परिषदांच्या या सर्व जागांसाठी एकूण २ हजार ६२४ उमेदवार निवडणूक लढवित आहेत.

सर्व १२५ पंचायत समित्या मिळून एकूण १ हजार ४६२ जागा असून, त्यातील ७३१ जागा महिलांसाठी राखीव आहेत. अनुसूचित जातींसाठी १६६, अनुसूचित जमातींसाठी ३८ आणि नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी ३४२ जागा आरक्षित आहेत. पंचायत समित्यांच्या या सर्व जागांसाठी एकूण ४ हजार ८१४ उमेदवार निवडणूक लढवत आहेत.

निवडणूक होत असलेल्या जिल्हा परिषदांच्या व त्यांतर्गतच्या पंचायत समित्यांच्या एकूण मतदारांमध्ये १ कोटी ६ लाख ३३ हजार २६९ पुरुष, १ कोटी १ लाख ८६ हजार ९६५ महिला तर ४६८ इतर मतदारांचा समावेश आहे. त्यांच्यासाठी एकूण २५ हजार ४७१ मतदान केंद्राची व्यवस्था करण्यात आली आहे. संपूर्ण मतदान प्रक्रियेसाठी सुमारे १ लाख २८ हजार इतक्या मनुष्यबळाची व्यवस्था केली आहे. त्यात सुमारे १२५ निवडणूक निर्णय अधिकारी आणि १२५ सहायक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

## लोकसभेत गोंधळ आणि घोषणाबाजी सुरुच; कामकाज ९ फेब्रुवारीपर्यंत स्थगित

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)-** लोकसभेत गोंधळ आणि घोषणाबाजी शुक्रवारीही राहिली. पहिल्यांदा कामकाज फक्त तीन मिनिटे चालले आणि दुसऱ्यांदा सात मिनिटे चालले. त्यानंतर आता लोकसभेचे कामकाज ९ फेब्रुवारीपर्यंत स्थगित करण्यात आले आहेत.

दरम्यान, केंद्रीय मंत्री रवनीत बिट्टू यांनी राहुल गांधींवर टीका करताना म्हटले की, काल सर्वांनी त्यांना अबोध बालक म्हटले. आज पंतप्रधानांची शाळा होती, जिथे मुलांना यशस्वी होण्यास शिकवले जाते. जर राहुल गांधीही पंतप्रधानांच्या शाळेत गेले असते तर ते आयुष्यात यशस्वी झाले असते.

लोकसभेचे कामकाज ९ फेब्रुवारीपर्यंत स्थगित करण्यात आले आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशन ६५ दिवसांत ३० बैठकांसाठी चालेल. ते २ एप्रिल रोजी संपेल. २८ जानेवारी रोजी सुरू झालेला पहिला टप्पा १३ फेब्रुवारी रोजी संपेल. त्यानंतर दुसरा टप्पा ९ मार्च रोजी सुरू होईल. लोकसभेत नऊ विधेयके प्रलंबित आहेत, ज्यात डेव्हलप्ड इंडिया एज्युकेशन फाउंडेशन बिल २०२५, सिक्युरिटीज मार्केट्स कोड २०२५ आणि संविधान (१२९ वी सुधारणा) बिल २०२४ यांचा समावेश आहे.

## लक्ष्मीकांत तांबोळी आणि योगिनी सातारकर यांना म.सा.प.चे कुसुमाग्रज व लीला धनपालवार विशेष काव्य पुरस्कार जाहीर

**नांदेड (प्रतिनिधी)-** मराठवाडा साहित्य परिषदेच्यावतीने देण्यात येणारे कुसुमाग्रज व लीला धनपालवार विशेष काव्य पुरस्कारांची घोषणा छत्रपती संभाजीनगर येथून करण्यात आली असून नांदेड येथील ज्येष्ठ कवी प्रा. लक्ष्मीकांत तांबोळी आणि कवयित्री प्रा. योगिनी सातारकर यांना यावर्षीचे पुरस्कार जाहीर झाले आहेत.





मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने गेल्या ३८ वर्षांपासून कुसुमाग्रज यांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस 'कवितादिन' म्हणून साजरा करण्यात येतो. या कवितादिनी कधी कविसंमेलन, कधी कवितेच्या क्षेत्रात लक्षणीय कामगिरी करणाऱ्या कवीस किंवा काव्यासमीक्षकास विशेष काव्यपुरस्कार, कवितेवर व्याख्याने किंवा कवितेवर चर्चासत्र असे उपक्रम घेतले जातात. यावर्षी दोन कवींना विशेष काव्यापुरस्कार देण्याचे परिषदेने ठरविले आहे. या पुरस्कारांच्या निवडीसाठी ज्येष्ठ कवयित्री अनुराधा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या निवड समितीने कविवर्य कुसुमाग्रज काव्यपुरस्कारासाठी ज्येष्ठ कवी प्रा. लक्ष्मीकांत तांबोळी आणि 'कवयित्री लीला धनपलवार' काव्य पुरस्कारासाठी कवयित्री योगिनी सातारकर-पांडे यांच्या नावांची शिफारस केली आहे. डॉ. दासू वैद्य आणि प्रा. श्रीधर नांदेडकर हे या समितीचे अन्य दोन सदस्य होते. निवड समितीने या दोन्ही कवींची एकमताने ही निवड केली असून प्रत्येकी ११ हजार रुपये रोख, शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह असे या पुरस्कारांचे स्वरूप असून शुक्रवार, दि. २७ फेब्रुवारी रोजी कुसुमाग्रजांच्या जन्मदिवशी परिषदेच्यावतीने हे पुरस्कार समारंभपूर्वक प्रदान करण्यात येतील.

सातत्याने दीर्घकाळ काव्यलेखन करणाऱ्या कवीस कविवर्य कुसुमाग्रज विशेष काव्य पुरस्कार आणि कवितालेखनाच्या क्षेत्रात आपली ओळख निर्माण करणाऱ्या कवीस कवयित्री लीला धनपलवार विशेष काव्यपुरस्कार देण्यात यावेत अशी साहित्य परिषदेची भूमिका आहे. यंदाचा 'कवितादिन' कुसुमाग्रजांच्या जन्मदिनी नांदेड येथे साजरा करण्याचे परिषदेने ठरविले असून नांदेड शाखा या समारंभाचे आयोजन करणार आहे, अशी माहिती ही मराठवाडा साहित्य परिषद छत्रपती संभाजी नगरच्या वतीने देण्यात आली आहे.

## शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी विविध तज्ज्ञांची समिती स्थापन

**मुंबई (प्रतिनिधी)-** राज्यातील शेतकऱ्यांसाठी बनवलेल्या समितीत आणखी काही महत्त्वाच्या सदस्यांचा समावेश करण्यात आला आहे. समितीत अपर मुख्य सचिव (जलसंपदा), प्रधान सचिव (माहिती व तंत्रज्ञान), सचिव (पदुम), कृषी आयुक्त आणि महाआयटीच्या व्यवस्थापकीय संचालकांचा समावेश करण्यात आला आहे. शेतकऱ्यांच्या जीवनात मूलगामी बदल घडवून आणण्यासाठी तसेच त्यांना थकीत कर्जाच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी उपाययोजना सुचवण्याच्या उद्देशाने सरकारला शिफारसी करण्यासाठी ही समिती गठीत करण्यात आली आहे. सरकारने स्थापन केलेल्या समितीला एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात राज्य सरकारला आपला अहवाल सादर करायचा आहे.




## आजपासून सुरू होणार टी-२० विश्वचषक क्रिकेटचा थरार

**मुंबई (प्रतिनिधी)-** पुरुषांचा आयसीसी टी-२० विश्वचषक शनिवार, ७ फेब्रुवारी २०२६ पासून सुरू होत आहे. या विश्वचषकाचा अंतिम सामना रविवार ८ मार्च २०२६ रोजी आहे. तब्बल २९ दिवस टी ट्वेंटी विश्वचषक स्पर्धा रंगणार आहे. भारत आणि श्रीलंका या दोन देशांनी यंदा विश्वचषकाचे संयुक्तरित्या आयोजन केले आहे. यंदाच्या विश्वचषकात वीस संघ सहभागी झाले आहेत. या संघांची प्रत्येकी पाच अशा पद्धतीने ए, बी, सी, डी या चार गटांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. गतविजेत्या भारताचा सलामीचा सामना मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर होणार आहे.




स्पर्धेच्या पहिल्या म्हणजे शनिवार ७ फेब्रुवारी रोजी तीन साखळी सामने होणार आहेत. श्रीलंकेतील कोलंबो येथे पाकिस्तान आणि नेदरलँड्स यांच्यात पहिला सामना होईल. कोलकात्यात वेस्ट इंडिज आणि स्कॉटलंड यांच्यात सामना रंगणार आहे. मुंबईत भारत आणि अमेरिका यांच्यात लढत होणार आहे.

पहिल्या टप्प्यात गट फेरी अर्थात साखळी सामन्यांची फेरी होणार आहे. यात प्रत्येक संघ गटातील इतर चार संघांशी प्रत्येकी एक सामना खेळेल. प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ सुपर ८ या फेरीत जातील. नंतर चार - चार संघांचे दोन गट केले जातील. सुपर ८ या फेरीअंती दोन्ही गटातून सर्वोत्तम २-२ संघ उपांत्य फेरीला पात्र ठरतील. यानंतर दोन उपांत्य सामने होतील. यातील पहिला उपांत्य सामना कोलंबो किंवा कोलकाता येथे तर दुसरा उपांत्य सामना मुंबईत वानखेडेवर होणार आहे. अंतिम सामना अहमदाबाद किंवा कोलंबो येथे होणार आहे.

## बेकायदेशीर डास प्रतिबंधक अगरबत्तींच्या विरोधात सरकारचे कारवाईचे आदेश

**मुंबई (प्रतिनिधी)-** सार्वजनिक आरोग्याचे संरक्षण करण्यासाठी महाराष्ट्राच्या कृषी विभागाने एक ठोस पाऊल उचलले आहे. राज्यभरातील सर्व कीटकनाशक निरीक्षकांना 'कम्फर्ट' आणि 'स्लीप वेल' या ब्रँड नावाने विकल्या जाणाऱ्या बेकायदेशीर डास प्रतिबंधक अगरबत्तींच्या विक्रीविरोधात तातडीने कठोर कारवाई करण्याचे निर्देश कृषी विभागाने दिले आहेत.

भारतामध्ये घरगुती कीटकनाशकांचा सुरक्षित आणि जबाबदारीने वापर व्हावा यासाठी काम करणाऱ्या, ना-नफा तत्त्वावर चालणाऱ्या होम इन्सेक्ट कंट्रोल असोसिएशन (एचआयसीए) या संस्थेने सरकारच्या या कारवाईचे स्वागत केले आहे. गेल्या काही महिन्यांपासून एचआयसीए ही प्रशासनाच्या संपर्कात होती. मंजुरी नसलेली रसायने वापरणाऱ्या डास प्रतिबंधक अगरबत्तींबाबत तिने संबंधित यंत्रणांना वेळोवेळी सतर्क केले होते.

यापूर्वी आंध्र प्रदेशमध्ये 'स्लीप वेल' आणि मुंबईमध्ये 'कम्फर्ट' या डास प्रतिबंधक अगरबत्तींच्या तपासण्या प्रयोगशाळांत करण्यात आल्या होत्या. त्यावेळी त्यांत बेकायदेशीर आणि मंजुरी नसलेली कीटकनाशके आढळली होती. त्यामुळे अनेक राज्यांमध्ये या प्रकरणाची चौकशी सुरू झाली आणि कारवाईही करण्यात आली. मुंबईत या संदर्भात अनेक ठिकाणी छापे घालण्यात आले आणि 'कम्फर्ट डास प्रतिबंधक अगरबत्ती'वर बंदी घालण्यात आली. त्यानंतर अवघ्या १५ दिवसांत महाराष्ट्र सरकारने आपली कारवाई राज्यव्यापी पातळीवर वाढवली असून, दोन्ही उत्पादनांची विक्री रोखण्यासाठी नवीन परिपत्रक जारी केले आहे.

महाराष्ट्राच्या कृषी संचालकांनी राज्यातील सर्व विभागीय सहसंचालकांना आणि कीटकनाशक निरीक्षकांना हे नवे परिपत्रक पाठवले आहे. 'कम्फर्ट' आणि 'स्लीप वेल' या डास प्रतिबंधक अगरबत्तींची विक्री करणाऱ्या किरकोळ विक्रेत्यांवर आणि वितरकांवर तातडीने कठोर कारवाई करण्याचे निर्देश त्यात देण्यात आले आहेत. या परिपत्रकानुसार, छापे घालणे, बेकायदेशीर साठा जप्त करणे, तसेच केलेल्या सर्व कारवाईचा अहवाल कृषी आयुक्तालयाकडे सादर करणे क्षेत्रीय अधिकाऱ्यांना बंधनकारक करण्यात आले आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# 'यूज अँण्ड थ्रो' कल्चर

मानवाच्या दैनंदिन जीवनाला व्यापून टाकलेल्या प्लास्टिकने आज पर्यावरणापुढे मोठे आव्हान उभे केले आहे. नुकत्याच झालेल्या निवडणुकीमुळे सगळीकडे प्लास्टिकच्या बॅगा, ग्लास, बॉटल आणि इतर वस्तू विखुरलेल्या दिसून येतात. याची काळजी राजकीय कार्यकर्त्याकडून घेण्यात आली नाही, यात काही नवल नाही. पूर्वीच्या काळी प्लास्टिकच्या कॅरीबॅगचा वापर केला जात नव्हता. त्या काळात कापडी, कागदी पिशव्या लोक वापरत होते, पण कालांतराने प्लास्टिकच्या पिशव्यांची उपलब्धता वाढली आणि हा एक सोपा पर्याय आहे हे दिसल्यानंतर त्याच्या वापरापेक्षाही जास्त गैरवापर वाढला, प्लास्टिकच्या कॅरीबॅगचा फार मोठा धोका पर्यावरणाला आहे. आपण एक कागदी पिशवी वापरली तर हा कागद नैसर्गिक पद्धतीने नष्ट होण्यासाठी केवळ पाच आठवडे लागतात. त्याची कुजण्याची प्रक्रिया तत्काळ होते आणि त्यामुळे पर्यावरणाला त्यापासून हानी होत नाही. कापडी पिशव्यांचे कापड नष्ट होण्यासाठी पाच महिने लागतात. ते कापड जमिनीखाली गाडून ठेवले तर पाच महिन्यांनी ते पूर्णपणे कुजते. त्यामुळे पर्यावरणाला त्यापासून नुकसान होत नाही. प्लास्टिक पिशव्यांचे मात्र तसे नाही. सध्या ज्यापासून प्लास्टिकच्या कॅरीबॅग बनवल्या जातात. ते प्लास्टिक नैसर्गिकपणे नष्ट होण्यासाठी निसर्गाला ५०० वर्षापेक्षा जास्त कालावधी लागतो. त्यामुळे ते नैसर्गिकपणे नष्टच होत नाही. प्लास्टिकच्या अतिवापरापेक्षा गैरवापरामुळे निसर्गाचे मोठे नुकसान होत आहे. आज प्लास्टिक कॅरीबॅगचा वापर ही गरज वा सोय कमी आणि स्टाईल अधिक बनली आहे. साध्या औषधाच्या गोळ्या घेतल्या तरीसुद्धा लोक दुकानदाराकडे कॅरीबॅग मागतात आणि ती दिली नाही तर जोरजोरात भांडतात देखील. दरवर्षी जगभरात ४० कोटी टनांहून अधिक प्लास्टिक तयार होते. त्यातील केवळ १० टक्के पुनर्वापरात येते. उर्वरित प्लास्टिक नदी, समुद्र, जंगल आणि मातीमध्ये मिसळत असून त्यामुळे पृथ्वीवरील जीवसृष्टीचे, निसर्गाचे प्रचंड नुकसान होत आहे. दुकानदारही गिऱ्हाईक टिकवायचे असते म्हणून ते कॅरीबॅग देतात. बरेचदा या कॅरीबॅग इतक्या पातळ असतात की, घरी जाईपर्यंत त्या फाटतात आणि दुसऱ्या दिवशी त्या कचऱ्यासोबत उकिरड्यावर जातात. याचा दुष्परिणाम किती मोठ्या प्रमाणावर होतो याचा विचार ना दुकानदार करतात ना ग्राहक ! सध्याच्या परिस्थितीत आपल्याकडे कचऱ्यामध्ये सर्वात मोठी समस्या आहे ती प्लास्टिकच्या पिशव्यांचीच. या पिशव्यांचा कचरा नष्ट होत नाही, त्यामुळे तो सर्वत्र पसरलेला दिसतो. त्यामुळे इतर अनेक समस्या निर्माण होताना दिसत आहेत. गटारे साफ करत असताना त्यामध्ये जास्तीत जास्त प्रमाणात प्लास्टिकच्या पिशव्या आणि प्लास्टिकच्या बाटल्याच सापडतात. पावसाळ्यात ही सर्व गटारे तुंबली जातात. थोडासा जरी पाऊस पडला तरी यामुळे रस्त्यावर पाणी येणे, वाहतुकीला अडथळा निर्माण होणे, सोसायट्यामध्ये पाणी जाणे हा प्रकार सर्वत्र दिसू लागला आहे. या परिस्थितीला प्लास्टिक आणि त्याचा वारेमाप वापर व टाकाऊ वृत्तीच कारणीभूत आहे. ही समस्या शहरांपुरतीच मर्यादित राहिलेली नाही. आज खेड्यातही प्लास्टिक कचऱ्यामुळे ओढे, नाले, गटारी तुंबलेली आढळतात. आज मुंबईसारख्या ठिकाणी किंवा समुद्र किनारी असणाऱ्या गावांमध्ये, शहरांमध्ये समुद्राच्या पाण्याचा तळ प्लास्टिकने झाकलेला आहे, इतका प्लास्टिकचा वापर वाढलेला आहे. ही एका भीषण धोक्याला जन्म घालणारी गोष्ट आहे. याचा जीवसृष्टी, जलसृष्टीवर अतिशय प्रतिकूल परिणाम होतो. समुद्र, नद्यांमध्ये राहणारे जलचर पाण्यात टाकलेले प्लास्टिक खाऊन नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. हे मृत प्राणी कापल्यानंतर त्यांच्या पोटात प्लास्टिक आढळल्याचे दिसून आले आहे. आपल्याकडे नदीत किंवा समुद्रात निर्माल्य टाकताना तेही व प्लास्टिकच्या पिशवीसकट टाकले जाते. घरातील कचराही प्लास्टिकच्या कॅरीबॅगमध्ये बांधून कचरा कुंडीत टाकला जातो. हा कचरा जी जनावरे खातात, त्यांच्या पोटात प्लास्टिक जाते. आपल्या गैरवापरामुळे दुसऱ्याचा जीव जातो आहे याचा विचार माणसाने केला पाहिजे. आज मानवी जीवनाच्या सर्व गरजांमध्ये प्लास्टिकचा वापर केला जात आहे. पेनामधील रिफिलचे उदाहरण घेतले तर पूर्वी आठ आण्याला सुटी रिफिल मिळत होती. आता ती प्लास्टिकच्या वेस्टनात मिळते. त्यामुळे तिचा आकर्षकपणा वाढला, किंमत वाढली, पण पर्यावरणाचे नुकसानही वाढले. कारण रिफिल काढून घेऊन ते प्लास्टिक आवरण टाकून दिले जाते. आपण जे रेडिमेड कपडे विकत घेतो ते प्लास्टिकच्या पिशवीतच असतात. त्यामध्ये कॉलरजवळ, हातोप्यांवर प्लास्टिक लावलेले असते. अशा प्लास्टिकचे काय करायचे हा प्रश्न असतो. वस्तू आकर्षक दिसावी या विक्रीकौशल्याच्या गरजेतून हे सर्व झाले आहे, पण याची खूप मोठी किंमत पर्यावरणाच्या हानीमुळे मोजावी लागत आहे. आजूबाजूला वावरणारे पक्षीही आज घरटे बांधताना प्लास्टिक वापरत असल्याचे दिसले आहे. या घरट्यांमध्येही प्लास्टिकचे कागद दिसले. म्हणजे नैसर्गिक पक्षी, प्राणीसुद्धा या वापराला तयार झाले की काय, असा प्रश्न निर्माण होतो, पण यामागचे खरे कारण असे आहे की, या पक्ष्यांना ज्या गोष्टी घरटे बांधण्यासाठी आवश्यक आहे, तेच जर उपलब्ध होत नसेल आणि जिथे तिथे प्लास्टिकच दिसत असेल तर त्या पक्ष्यांचाही नाईलाज आहे. प्लास्टिकचा एवढा अट्टाहास कशासाठी याचे उत्तर आपल्याकडे बोकाळत चाललेल्या 'यूज अँण्ड थ्रो' कल्चरमध्ये आहे. जागतिकीकरणानंतर आलेल्या नवअर्थकारणामध्ये आणि बाजारधिष्ठित अर्थव्यवस्थेमध्ये 'वापरा आणि टाका' ही संस्कृती वेगाने पसरत गेली.

# मानवतेची आई - रमाई



रमाई भिमराव आंबेडकर हे फक्त नाव नाही माणवता, संघर्ष, संसाराची तडजोड, समजदार पणा व कर्तव्यांची जाणीव असलेली वैचारिक खान म्हणजे रमाई. शिक्षणाने अडाणी आणि पैशाने गरिब असलेल्या या मानवतावादी आईने सर्वोत्तम विद्वान असलेल्या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना आणि आजही समाजाला खुप काही शिकवले आहे. रमाईचा संघर्ष, संकटातून सावरण्याचे माणसिक सामर्थ्य हे सर्व सामान्य महिलेला जमने शक्यच नसताना रमाई ने त्याचा अनुभव पावलो पावली घेतला. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची पत्नी म्हणून रमाईला तर महत्व आहेच परंतु रमाईचा त्याग आणि कतृत्व बघितले तर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून माणसिक बळ देण्याचे महत्वपूर्ण रमाई ने केले म्हणून रमाई अजून जास्त वंदनीय आहेत. रमाई समजून घेताना प्रत्येकांचे डोळे पानावले जातात कारण जन्मापासून तर मृत्यूपर्यंत रमाईने केला तो फक्त संघर्ष आणि त्याग. आणि हा संघर्ष आणि त्याग स्वहीत साधण्यासाठी, स्वतः साठी बंगले बांधुन महागड्या गाडी मध्ये मेकअप करून फिरण्यासाठी तर मुळीच नव्हता. आज आपण समाजामध्ये बघतो तर दोन पैसे कमवणारा माणूस असला तर बायको वेगळ्याच तोऱ्यात राहते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे तर सर्वश्रेष्ठ विद्वान होते रमाईने तर किती तोऱ्यात रहायला पाहिजे होतं परंतु रमाई ने आपल्या पुर्ण इच्छा मारून समाजाच्या उत्थानासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना साथ दिली. समाजासाठी रमाईचा त्याग काय आहे याची कल्पना देखील करू शकत नाही. कारण स्वतः चे तिन मुलं एक मुलगी रमाईने गमावली. लहानपणापासून आई वडील भावंडे यांचे मृत्यू बघुन रमाई चे मन मेलेच होते परंतु लग्नानंतर पोटचे मुलं, वडीलांसारखे माया लावणारे सासरे, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे भाऊ आनंदराज यांचा मृत्यू देखील रमाई ने पाहीला. बाबासाहेब परदेशात शिक्षण घेत आहेत त्यांना शिक्षणात कोणत्याही प्रकारचा व्यत्यय येऊ नये म्हणून रमाईचा मुलगा वारतो रमाई स्वतः त्याचा अत्यंविधी करतात, दुखाचे अश्रू पिऊन स्वत:लाच समजवतात परंतु बाबासाहेब आंबेडकर यांना याची कल्पनाही देत नाहीत. केवढे मन असेल या आईचे. आपण मुलाला साधा ताप आला तर सर्व कामे सोडून अगोदर मुलाच्या दवाखान्याच बघतो. परंतु रमाईने मुल गेले तरी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना व्यत्यय आणला नाही म्हणून आज रमाईच्या संघर्षामुळे करोडो मुलं सुरक्षित आहेत हा त्याग रमाईचा आहे आणि याची जाणीव आपण ठेवली पाहिजे. लग्नानंतर गौऱ्या थापुन त्या विकुन, एकाच लुगड्यावर राहून मिळालेला पैसा डॉक्टर बाबासाहेब यांना शिक्षणासाठी कामी येईल म्हणून पै पै जमा करून बाबासाहेब आंबेडकर यांना हातभार लावणारी रमाई खऱ्या अर्थाने संसाराची जाणीव असणारी सर्व श्रेष्ठ स्त्रि ठरली.

लग्नानंतर सुरवातीच्या काळात रमाई व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची परिस्थिती हलाखीची होती परंतु नंतरच्या काळात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे प्राध्यापक म्हणून रूजू झाले आणि दरमहा साडेचारशे रुपये पगार घरात येऊ लागला. थोडा विचार करा शंभर वर्षा अगोदर साडेचारशे रुपये पगार, जगातील विद्वान माणसाच्या बायकोने कसे रहायला पाहिजे. परंतु आलेला पगार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व रमाई यांनी स्वतः च्या संसारावर खर्च न करता तोच पैसा समाजावर खर्च केला. आणि पुन्हा आपल्य ईच्छा मारल्या. आणि समाजाला जगवण्यासाठी सामाजिक उपाययोजना करण्यासाठी रमाई ने बाबासाहेब आंबेडकर यांना साथ सहयोग केला. पुढे बाबासाहेब मुंबई प्रांताचे आमदार सुद्धां झाले. विचार करा डॉ बाबासाहेब आंबेडकर हे शंभर वर्षाअगोदर आमदार होते, ख्यातनाम वकील व बुद्धीवान प्राध्यापक होते. आता तर त्यांना वैयक्तिक काही अडचण नव्हती. वैयक्तिक संसार करायचा तर अगदी थाटामाटात केला असता परंतु रमाईने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आमदार झाले तरी- ही कोणत्याही मोहात पडल्या नाही अथवा बाबासाहेब आंबेडकर यांचे समाजावरून लक्ष विचलित होईल असे काहीही केले नाही. नाही संसार करताना कोणत्याही गोष्टीचा हट्ट केला नाही, ना दागिने ना कपडे याचा मोह केला नाही. केला तो फक्त नवऱ्यावर विश्वास. दिली ती नवऱ्याला साथ. म्हणून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे समाजासाठी खुप काही करू शकले. रमाईच्या मनात थोडा जरी पैशाचा गर्व, पदाचा अंहकार आला असता तर कदाचित डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक चळवळीमध्ये कमी पडले असते. परंतु रमाईच्या संघर्ष व त्यागापुढे डॉ. बाबासाहेब हे सुद्धां नतमस्तक झाले होते. कारण बाबासाहेब आंबेडकर यांचे कोणतेही काम रमाईच्या संघर्षाशिवाय पुर्णच होऊ शकले नसते. एका आमदाराची बायको म्हणून नव्हे तर दबलेल्या, दुर्लक्षित असलेला घटक म्हणून रमाई जगली. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना नोकरी लागल्या नंतर रमाई व बाबासाहेब यांना वैयक्तिक कोणत्याही प्रकारची अडचण नसताना रमाई ने समाजासाठी संपूर्ण आयुष्य अडचणी मध्ये काढणे म्हणजे केवढा त्याग आणि समर्पण म्हणावे लागेल.

रमाईच्या त्याग संघर्ष आणि समर्पणातुन बरेच काही शिकण्यासारखे आहे. प्रत्येक यशस्वी पुरुषामागे स्त्रि चा हात असतो याचे जागतिक उदाहरण म्हणजे फक्त रमाई आहे. आर्थिक आवक येत असताना ही अर्थला अर्थ न देता निद्रावस्थेत असलेल्या समाजाला जागे करण्यासाठी, विषमतेवर आधारित व्यवस्था उलथून टाकून समतावादी व्यवस्था निर्माण करण्यासाठी, कोणतेही हक्क अधिकार नसलेल्या समाजाला हक्क अधिकार मिळवून देण्यासाठी रमाई ने बाबासाहेब आंबेडकर यांचे मानसिक खच्चीकरण कधीच केले नाही. म्हणून रमाई एक आदर्श पत्नी, आणि करोडो लोकांची आदर्श आई रमाईला होता आले. संघर्ष व त्यागाचे काय फलीत मिळाले तर आयुष्य भर दहा बाय दहाच्या घरात फाटक्या लुगड्यात दिवस काढणारी रमाई आज करोडो लोकांच्या बंगल्यात आहे. दागिण्याची हाव न केलेली रमाई आज करोडो महिलांच्या ताईत आहे. खऱ्या अर्थाने कर्माचे तेच फळ आहे. रमाईचे आयुष्य फक्त छत्तीस सदतीस वर्षाचे परंतु वर्षानुवर्षे रमाईचा त्याग, समर्पण, बाबासाहेब आंबेडकर यांना दिलेला साथ सहयोग हा आपण विसरू शकत नाही. रमाईचा संघर्ष डोळे पानावरा जरी असेल तरी आज आपल्याला फक्त डोळे ओले करून चालणार नाही. इच्छा मारून, मुलांना गाडून, दागदागीन्याची अपेक्षा न करता समाजाच्या न्याय हक्कासाठी रमाईने बाबासाहेब आंबेडकर यांना साथ दिली म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर समाजाला न्याय हक्क अधिकार व स्वातंत्र्य देऊ शकले. परंतु आज डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले सर्व काही धोक्यात आहे. म्हणून रमाई जयंती साजरी करताना फक्त रडून फायदा नाही तर रमाईच्या त्याग व संघर्षातून मिळालेल्या गोष्टी वाचण्यासाठी आपल्याला एकत्र येऊन लढावे लागेल. तरच रमाईची जयंती साजरी करून रमाईला नतमस्तक होण्याचे सार्थक होईल.

**-विनोद सदावर्ते**
रा. आरेगाव ता. मेहकर
मो. ९१३०९७९३००

# समाजसेवेची अखंड साधना : साधनाताई आमटे



समाजातील दुर्लक्षित, उपेक्षित आणि दुःखग्रस्त घटकांसाठी आपले संपूर्ण आयुष्य अर्पण करणाऱ्या थोर समाजसेवकांमध्ये साधनाताई आमटे यांचे नाव आदराने घेतले जाते. वैभव, सुरक्षितता आणि सन्मान मिळू शकणाऱ्या जीवनमार्गाला नकार देत त्यांनी संघर्ष, कष्ट आणि त्यागाने भरलेला समाजसेवेचा मार्ग स्वीकारला. हा मार्ग निवडताना त्यांनी कधीही स्वतःचा विचार केला नाही; उलट समाजातील शेवटच्या माणसाचा विचार हाच त्यांच्या जीवनाचा केंद्रबिंदू ठरला.

कुष्ठरोग्यांविषयी समाजात असलेली भीती, अज्ञान आणि तिरस्कार दूर करण्यासाठी बाबासाहेब आमटे जसे झटत होते, तसेच त्या कार्याला मनापासून साथ देणाऱ्या साधनाताई या आनंदवनच्या उभारणीतल्या खऱ्या शिल्पकार होत्या. बाबांच्या समाजकार्याला केवळ सहनशीलतेची साथ नव्हे, तर प्रत्यक्ष श्रमांची, त्यागाची आणि मानसिक बळाची जोड साधनाताईंनी दिली.

आनंदवन उभारताना त्यांना अनेक अपमान, गैरसमज आणि सामाजिक विरोधाला सामोरे जावे लागले; मात्र त्यांचा संयम कधीही ढळला नाही. ५ मे १९२६ रोजी नागपूर येथे जन्मलेल्या साधनाताईंचे बालपण जबाबदाऱ्यांनी वेढलेले होते. वडिलांचे अकाली निधन झाल्यामुळे घराची संपूर्ण जबाबदारी आईवर आणि मोठ्या भावंडांवर आली. इंदू घुले या नावाने ओळखल्या जाणाऱ्या साधनाताईंनी लहान वयातच कष्ट, काटकसर आणि शिस्त यांचे महत्त्व शिकले. अभ्यासात प्राविण्य असूनही कौटुंबिक परिस्थितीमुळे त्यांना शिक्षण अर्धवट सोडावे लागले; पण जीवनाचे खरे शिक्षण त्यांनी समाजाच्या शाळेत घेतले.

१८ डिसेंबर १९४६ रोजी बाबा आमटे यांच्याशी विवाह झाल्यानंतर त्यांच्या जीवनाला नवी दिशा मिळाली. वरोऱ्यातील हरिजन वस्तीत राहण्याचा निर्णय हा त्या काळात धाडसाचा होता. जातिभेद, अस्पृश्यता आणि सामाजिक रूढी मोडून काढण्याचा हा निर्णय साधनाताईंनी अत्यंत शांतपणे, पण ठामपणे स्वीकारला. समाजाने नाकारलेल्या लोकांना आपलेसे करताना त्यांनी स्वतःच्या भावना,




भीती आणि वेदना बाजूला ठेवल्या.

आनंदवनच्या प्रारंभिक काळात परिस्थिती अत्यंत कठीण होती. राहण्यास योग्य घर नव्हते, पुरेसे अन्न नव्हते, औषधांची कमतरता होती. अशा अवस्थेत साधनाताईंनी रुग्णांची सेवा, स्वयंपाक, जनावरांची काळजी, मुलांचे संगोपनसर्व जबाबदाऱ्या निस्वार्थ भावनेने स्वीकारल्या. त्या कधीच प्रसिद्धीच्या झोतात राहिल्या नाहीत; पडद्यामागे राहून काम करणं हाच त्यांचा स्वभाव होता. या सर्व संघर्षांतून जात असतानाच त्यांना मातृत्वाचा आनंदही लाभला. डॉ. विकास आमटे आणि डॉ. प्रकाश आमटे हे त्यांचे दोन्ही पुत्र केवळ जैविक संतती नव्हते, तर समाजसेवेच्या संस्कारांचे प्रतीक होते. कठीण परिस्थितीत मुलांचे संगोपन करताना साधनाताईंनी त्यांना केवळ शिक्षणच नव्हे, तर माणुसकी, संवेदनशीलता आणि सामाजिक जबाबदारीचे धडे दिले.

आनंदवनातील रुग्ण, अनाथ मुले आणि अपंग व्यक्ती यांच्यात वाढलेल्या या दोन्ही मुलांनी आई-वडिलांच्या कार्याचे मोल प्रत्यक्ष अनुभवले. डॉ. विकास आमटे यांनी आनंदवनातील कुष्ठरोगी व अपंगांच्या पुनर्वसनासाठी आयुष्य वाहिले. प्रशासन, वैद्यकीय सेवा आणि मानवी मूल्ये यांचा समतोल साधत त्यांनी आनंदवनचे कार्य अधिक विस्तारले. दुसरीकडे, डॉ. प्रकाश आमटे यांनी गडचिरोली जिल्ह्यातील हेमलकसा येथे आदिवासी समाजासाठी आरोग्य, शिक्षण आणि विकासाची चळवळ उभी केली. दुर्गम जंगलात राहून आदिवासींच्या विश्वासात उतरून केलेले त्यांचे कार्य म्हणजे साधनाताईंच्या संस्कारांचीच फलश्रुती आहे.

साधनाताई अनेक अनाथ व दुर्लक्षित मुलींच्या आई झाल्या. रेणुका, बिजली यांसारख्या मानसकन्यांना त्यांनी प्रेम, सुरक्षितता आणि स्वाभिमान दिला. आई या शब्दाचा अर्थ त्यांनी केवळ जन्म देणारी स्त्री एवढ्यापुरता मर्यादित ठेवला नाही, तर आधार देणारी, उभारी देणारी आणि घडवणारी शक्ती म्हणून जगून दाखवला. त्यांच्या समिधा या आत्मचरित्रात आपल्या जीवनातील संघर्ष, त्याग आणि समाजसेवेचा अंतर्मुख प्रवास अत्यंत प्रामाणिक मांडला आहे. यातून त्यांचे लेखन कौशल्य आपल्याला अनुभवायला मिळते. विनोबा भावे यांनी त्यांना खरी पतिव्रता असे संबोधले. त्याच बरोबर तरी साधनाताईंचे जीवन केवळ पतीनिष्ठ नव्हते तर समाजनिष्ठ, कर्तव्यनिष्ठ आणि मूल्यनिष्ठ होते. कॅन्सर व किडनीच्या आजाराशी दीर्घकाळ झुंज देत त्यांनी वेदनांवर संयमाने मात केली. ९ जुलै २०११ रोजी त्या शांतपणे या जगातून निघून गेल्या; मात्र त्यांचे विचार, कार्य आणि संस्कार आजही जिवंत आहेत.

साधनाताई आमटे म्हणजे त्यागाची मूर्ती, करुणेची प्रतिमा आणि सेवाभावाचा दीपस्तंभ. त्यांच्या जीवनातून समाजाला माणुसकीची दिशा मिळाली आणि त्यांच्या दोन्ही मुलांच्या कार्यातून ती दिशा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचत आहे. म्हणूनच साधनाताईंचे जीवन हे केवळ एक व्यक्तिचित्र न राहता, समाजसेवेचा जिवंत आदर्श ठरते. त्याग, करुणा आणि सेवाभाव यांचे मूर्तिमंत रूप म्हणजे साधनाताई आमटे. त्यांचे जीवन म्हणजे समाजासाठी झटणाऱ्या प्रत्येकाला आजही माणूसकीची आणि समर्पणाची वाट दाखवणारी ही यशोगाथा..

**-डॉ. दीपाली चंद्रकांत पांडे**
पु. अ. होळकर महाविद्यालय राणी सावरगाव

# जागरूकतेचा अभाव आणि कर्करोगाचा प्रसार



कॅन्सर, टीबी आणि हार्ट अटॅक यासारख्या आजारांची आकडेवारी कोरोनाच्या काळात समोर येऊ शकली नव्हती. मात्र आता आलेली कर्करोगाची ताजी आकडेवारी देशाची भयावह स्थिती दर्शवते. पंजाब, हरियाणा, हिमाचल आणि चंदीगडमध्ये कर्करोगाच्या रुग्णांची संख्या सातत्याने वाढत आहे. काही दिवसांपूर्वी राज्यसभेत अधिकृत आकडेवारी सादर करताना, केंद्रीय आरोग्यमंत्र्यांनी स्वत: सांगितले की २०२० ते २०२२ या काळात देशात कर्करोगाच्या रुग्णांमध्ये आणि त्यामुळे होणाऱ्या मृत्यूंच्या संख्येत वाढ झाली आहे. इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च (आइसीएमआर) च्या राष्ट्रीय कर्करोग नोंदणी कार्यक्रमानुसार, २०२० मध्ये विविध राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये कर्करोगाच्या रुग्णांची अंदाजे संख्या १३,९२,१७९ होती आणि २०२१ मध्ये ती १४,२६,४४७ आणि २०२२ मध्ये १४ ,६१,४२७ वाढली. २०२० मध्ये भारतातील कर्करोगाने मृत्यूचे अंदाजे प्रमाण ७,७०,२३० होते आणि ते २०२१ मध्ये ७,८९,२०२ आणि २०२२ मध्ये ८,०८,५५८ पर्यंत वाढले आहे.

एका प्रश्नाच्या उत्तरात आरोग्यमंत्र्यांनी सांगितले होते की, आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभाग, राज्यांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांच्या आधारे, आरोग्य अभियानांतर्गत (एनएचएम) कर्करोग, मधुमेह, हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोग, स्ट्रोक प्रतिबंध आणि नियंत्रण (एनपीसीडीसीएस) या राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत , राज्ये आणि केंद्र केंद्रशासित प्रदेशांना तांत्रिक आणि आर्थिक मदत पुरवली जाते. कर्करोग हा एनपीसीडीसीएस चा अविभाज्य भाग आहे आणि या कार्यक्रमाचा उद्देश पायाभूत सुविधा मजबूत करणे, मानव संसाधन विकास, आरोग्य संवर्धन आणि कर्करोग प्रतिबंध, त्याचे लवकर निदान, व्यवस्थापन आणि कर्करोगासह असंसर्गजन्य रोग (एनसीडी) चे उत्तम आरोग्यसेवा उपचार यासाठी जागरूकता निर्माण करणे यावर लक्ष केंद्रित केले आहे.

एनपीसीडीसीएस अंतर्गत, ७०७ जिल्हा एनसीडी केंद्रे, २६८ जिल्हा काळजी केंद्रे आणि ५,५४१ सामुदायिक आरोग्य केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत आणि सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवेचा एक भाग म्हणून सामान्य असंसर्गजन्य रोग, म्हणजे मधुमेह, उच्च रक्तदाब आणि सामान्य कर्करोग यांच्या प्रतिबंध, नियंत्रण आणि तपासणीसाठी लोकसंख्या-आधारित उपक्रम देखील सुरू करण्यात आले आहेत. या उपक्रमांतर्गत, तीस वर्षांपेक्षा जास्त वयाच्या व्यक्तींना तोंड, स्तन आणि गर्भाशयाच्या मुखाच्या तीन सामान्य कर्करोगाच्या तपासणीसाठी लक्ष्य केले जाते. २०२२ मध्ये कर्करोगाच्या रुग्णांची अंदाजे संख्या १४६१४२७ होती, ज्यामध्ये पुरुषांपेक्षा स्त्रिया जास्त होत्या. महिलांची संख्या ७४९२५१ तर पुरुषांची संख्या ७१२१७६ होती. महिला आणि पुरुषांमध्ये सर्वाधिक कर्करोग पचनसंस्थेच्या अवयवांमध्ये (२,८८,०५४), स्तन (२,२१,७५७), प्रजनन प्रणाली (२,१८,३१९), तोंड (१,९८,४३८) आणि श्वसन प्रणाली (१,४३,०६२) मध्ये होतात.

महिला आणि पुरुषांमध्ये वयाच्या ७४ व्या वर्षांपर्यंत कर्करोग होण्याचा धोका नऊपैकी एक असा आहे. पुरुषांमध्ये फुफ्फुसाच्या कर्करोगाचा धोका ६७ पैकी एक आणि महिलांमध्ये स्तनाच्या कर्करोगाचा धोका २९ पैकी एक असे प्रमाण आहे. इंडियन मेडिकल कौन्सिल ऑफ रिसर्चच्या डिसेंबर २०२२ च्या आकडेवारीनुसार, देशात स्तनाच्या कर्करोगाची सुमारे १,८२,००० प्रकरणे आढळून आली आहेत. २०३० पर्यंत ही प्रकरणे अडीच लाखांपर्यंत वाढू शकतात. जागतिक आरोग्य संघटनेच्या अंदाजानुसार, २०१८ मध्ये कर्करोगामुळे एकूण ९६ लाख मृत्यू झाले. यापैकी सत्तर टक्के मृत्यू गरीब देशांमध्ये किंवा भारतासारख्या मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये झाले आहेत. याच अहवालानुसार, भारतात कर्करोगामुळे ७.८४ लाख मृत्यू झाले आहेत. म्हणजेच कर्करोगामुळे होणाऱ्या एकूण मृत्यूंपैकी आठ टक्के मृत्यू हे एकट्या भारतात झाले आहेत.

आजदेखील अनेक स्त्रिया लाज आणि भीतीमुळे आजार सांगायला तयार नाहीत. कर्करोगावर उपचार घेत असलेले अनेक रुग्ण कर्करोग हा पिढ्यानपिढ्याचा आजार आहे, असे मानतात, तर वैद्यकीय शास्त्रानुसार केवळ पाच टक्के कर्करोग पालकांकडून मुलांकडे जातो, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. पंजाबमध्ये कॅन्सरचे प्रमाण वाढण्यामागे कीटकनाशकांचा अतिवापर हे एक कारण असल्याचे सांगण्यात आले आहे. नैऋत्य पंजाबमधील कापूस पिकवणाऱ्या जिल्ह्यांमध्ये कॅन्सरचे प्रमाण असामान्यपणे जास्त आहे, जे इतर घटकांसह कीटकनाशकांच्या वापराशी संबंधित आहे. जगभरातील देशांमध्ये कर्करोगाविरुद्धचे युद्ध सुरू आहे. पण जितक्या वेगाने उपाय शोधले जात आहेत तितक्याच वेगाने त्याचा प्रसारदेखील होत आहे. मात्र, या आजारापासून मुक्ती मिळवण्यासाठी देशी पद्धतींद्वारे उपचाराच्या शक्यता शोधण्याचे अनेक प्रयत्न सुरू आहेत. आहारात बदल करून त्यांच्यावर उपचार करण्याचेही काही प्रयत्न चालले आहेत.

असाच एक प्रयोग जादवपूर विद्यापीठाच्या वैद्यकीय विभागात करण्यात आला, ज्यामध्ये दैनंदिन आहारात वापरल्या जाणाऱ्या पदार्थांपासून बनवलेल्या सर्वपिष्टी या औषधाची चाचणी करण्यात आली. औषधाच्या परिणामकारकतेची पातळी तपासण्यासाठी साधारणपणे दोन प्रकारच्या चाचण्या केल्या जातात- पहिली म्हणजे औषधीय (फार्माकोलॉजिकल) चाचणी आणि दुसरी विष विद्यासंबंधी (टोक्सीकोलाजिकल) चाचणी. आयात केलेल्या पांढऱ्या उंदरांवर या चाचण्या करण्यात आल्या. प्राण्यांच्या शरीरात कर्करोगाच्या पेशी प्रविष्ठ करण्यात आल्या आणि जेव्हा ट्यूमर तयार झाला तेव्हा औषध द्यायला सुरुवात केली गेली. 'पोषण ऊर्जा' चाचणी स्थितीत, चौदा दिवसांनंतर आढळलेला प्रतिसाद पाहिला असता, या पेशींची संख्या लक्षणीयरीत्या कमी होऊ लागली होती. प्राण्यांच्या शरीरात अल्सर निर्माण झाले नाहीत.

ट्यूमरच्या वाढीचा दर सहाचाळीस टक्क्यांनी कमी झाला आणि औषधाची विषारीता जवळजवळ शून्य होती. असे सकारात्मक परिणाम अलीकडच्या काळात दिसून आले नव्हते. या औषधामध्ये कॅन्सरपासून बचाव करण्यासाठी आणि त्याच्याशी लढण्यासाठी अपार अशी शक्यता आहेत. चाचण्या घेणाऱ्या डॉ. चॅटर्जी यांच्या निष्कर्षांवरून हे औषध कर्करोगाच्या रुग्णांसाठी अत्यंत प्रभावी असल्याचे सिद्ध झाले आहे. आधुनिक वैद्यकशास्त्राबरोबरच कर्करोगाच्या रुग्णांच्या उपचारातही त्याचा उपयोग प्रभावी ठरला आहे. परंतु औषधांना मान्यता देणाऱ्या संस्थांनी अजून त्याला मान्यता न दिल्याने ते अद्याप बाजारात उपलब्ध झाले नाही. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की तुमच्या कर्करोगाच्या उपचारात काही दिवसांचा विलंबदेखील घातक ठरू शकतो. दुसरी सकारात्मक गोष्ट म्हणजे थायरॉईड, गर्भाशय आणि स्तनाचा कर्करोग यांसारख्या काही प्रकारच्या कर्करोगाच्या जवळपास इलाज शंभर टक्के पोहचला आहे. टेस्टिक्युलर आणि थायरॉईड सारख्या कर्करोगात, आपण सहजपणे म्हणू शकतो की बरे होण्याची शंभर टक्के शक्यता आहे, परंतु स्वादुपिंड (पेनक्रिएटिक) सारख्या कर्करोगाच्या इतर प्रकारांच्या बाबतीत, जगण्याची शक्यता कमी आहे. खरं तर कोणते संशोधन आपल्याला बरा होण्याच्या जवळ जाईल हे सांगता येणे कठीण आहे. आम्ही खात्रीने एवढेच म्हणू शकतो की औषधे, केमो आणि रेडिएशनद्वारे उपचार चांगले होत आहेत.

**-मच्छिंद्र ऐनापुरे**
जत, जि. सांगली

## थोडक्यात...

### शेतमालकांनी शेत विक्रीसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रम अंतर्गत भूमिहीन दारिद्र्यरेषेखालील आदिवासीचे सबळीकरण व स्वाभिमान योजनेअंतर्गत ४ एकर जिरायती (कोरडवाहु) किंवा २ एकर बागायती (ओलीताखालील) जमीन उपलब्ध करुन देणे ही योजना राबवायची आहे.

याकरिता नांदेड जिल्ह्यातील प्राधान्याने किनवट व माहूर तालुक्यातील इच्छुक शेतमालकांनी आपला शेत विक्रीसाठी आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्र. भुवायो–२०१८/प्र.क्र.१२७/का–१४ दि. २८ जुलै २०२१ मधील परिच्छेद क्र. ०२ व परिशिष्ठ–ब नुसार शेती विकणेसाठी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प किनवट जि. नांदेड येथे माहिती सुविधा केंद्रामध्ये परिपूर्ण अर्ज, आवेदन पत्र भरणा करावे तसेच आपले अर्ज, आवेदन सुट्टीचे दिवस वगळता कार्यालयीन वेळेत सादर करण्यात यावेत असे आवाहन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी जेनितचंद्रा दोन्तुला यांनी केले आहे.

### जिल्हाधिकारी कार्यालयात मंगळवारी पेन्शन अदालत

**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड जिल्ह्यातील महसूल विभागातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या अडचणीचे निवारण करण्यासाठी दुसऱ्या मंगळवार, दि. १० फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ ते १.३० वा. या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे पेन्शन अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

सेवानिवृत्त झालेले अधिकारी, कर्मचारी यांनी अडचणी निवारण्यासाठी पेन्शन अदालतीच्या दिवशी उपस्थित राहून तक्रारीचे निवेदन द्यावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी नांदेड यांनी केले आहे.

# दमरेचे महाव्यवस्थापक संजयकुमार श्रीवास्तव यांनी केली आदिलाबाद- मुदखेड- पूर्णा रेल्वे विभागाची तपासणी

**नांदेड (प्रतिनिधी)**– दक्षिण मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक संजयकुमार श्रीवास्तव यांनी गुरुवार, दि. ५ फेब्रुवारी रोजी नांदेड विभागातील आदिलाबाद–मुदखेड–पूर्णा या रेल्वे विभागाची सविस्तर तपासणी केली. या तपासणीदरम्यान त्यांच्यासोबत विभागीय रेल्वे व्यवस्थापक प्रदीप कामले उपस्थित होते.

महाव्यवस्थापकांनी आपल्या तपासणीची सुरुवात आदिलाबाद रेल्वे स्थानकापासून केली. येथे अमृत स्टेशन योजनेअंतर्गत सुरू असलेल्या पुनर्विकास कामांच्या प्रगतीचा त्यांनी आढावा घेतला. तसेच क्रू लॉबी, संयुक्त क्रू रनिंग रूमची पाहणी करून कर्मचाऱ्यांसाठी उपलब्ध सुविधा व सोयी तपासल्या. यावेळी आदिलाबाद विधानसभा मतदारसंघाचे आमदार पायल शंकर यांनी महाव्यवस्थापकांची भेट घेऊन त्यांच्या मतदार–संघातील रेल्वे विकास प्रकल्पांबाबत चर्चा केली. त्यानंतर विविध लोकप्रतिनिधींनी



महाव्यवस्थापकांची भेट घेऊन आपल्या मागण्या सादर केल्या.

महाव्यवस्थापकांनी आदिलाबाद किनवट विभागा–तील लेव्हल क्रॉसिंग गेट क्रमांक २३ ची पाहणी करून गेट बूम, नोंदी, सुरक्षा साधने आदींची तपासणी केली. यानंतर त्यांनी गेटमनशी संवाद साधून कामकाज व कार्यस्थितीची माहिती घेतली.

संजयकुमार श्रीवास्तव यांनी किनवट रेल्वे स्थानकाची सविस्तर तपासणी करताना प्रवासी सुविधा व उपलब्ध सोयींचा आढावा घेतला. त्यांनी तिथे तिकीट बुकिंग काऊंटर, प्रतीक्षालय, स्थानक अधीक्षक कार्यालय तसेच सर्क्युलेटिंग एरियाची पाहणी केली. अमृत स्टेशन योजनेअंतर्गत सुरू असलेल्या पुनर्विकास कामांच्या प्रगतीचा त्यांनी आढावा घेतला. विभागीय अधिकाऱ्यांनी कामांची सविस्तर माहिती सादर केली. ठरवलेल्या कालावधीत कामे पूर्ण करण्यासाठी गती वाढवण्याच्या सूचना महाव्यवस्थापकांनी दिल्या.

महाव्यवस्थापकांनी पूल क्रमांक ११० ची सखोल तपासणी करून सर्व सुरक्षा बाबींचा आढावा घेतला. त्यांनी वळण क्रमांक ४० येथे ट्रॅक देखभाल व सुरक्षिततेची पाहणी केली. तसेच गँगमनशी संवाद साधला.

यानंतर संजयकुमार श्रीवास्तव यांनी हिमायतनगर रेल्वे स्थानकाची तपासणी करून अमृत स्टेशन योजनेअंतर्गत सुरू असलेल्या पुनर्विकास कामांचा आढावा घेतला. पुढे त्यांनी भोकर व मुदखेड अमृत स्थानकांवरील पुनर्विकास कामांचीही पाहणी केली. तपासणीदरम्यान त्यांनी विविध लोकप्रतिनिधींशी भेट घेऊन त्यांच्या निवेदनांचा स्वीकार केला.

तसेच तपासणीदरम्यान महाव्यवस्थापकांनी पूर्णा अमृत स्थानकावरील सुरू असलेल्या पुनर्विकास कामांचा आढावा घेतला. प्रवासी सुविधांमध्ये वाढ करण्यासाठी कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. पूर्णा रेल्वे स्थानकावर उपलब्ध वैद्यकीय मदत वाहन (एमआरव्ही) व अपघात मदत गाडी (एआरटी) यांच्या तयारी व सुविधांचीही त्यांनी तपासणी केली.

# संत विचारच माणसाचे खरे तारणहार –प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये

**नांदेड (प्रतिनिधी)**– संत विचारच माणसाचे खरे तारणहार आहेत, असे प्रतिपादन संत साहित्याचे साक्षेपी अभ्यासक, कीर्तनकार, योगा–प्राणायाम प्रशिक्षक प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये यांनी केले.

श्री संत भगवान बाबा जयंतीच्या निमित्ताने आयोजित चला, संत विचारांनी महाराष्ट्र जागवूया या विषयावर प्रा.डॉ.जायभाये बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हिंगोली जिल्हा कार्यकारी अधिकारी नामदेव केंद्रे, उद्घाटक नांदेड शहर वाहतूक पोलीस निरीक्षक साहेबराव गुट्टे होते. याशिवाय गोविंद नादेडे, संतोष तांबे, शिवा कांबळे, उमेश मुंडे, संतराम गित्ते, अनिता मुंडे, प्रवीण केंद्रे आदी मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रास्ताविक मुख्य आयोजक विठ्ठल पावडे, यांनी केले. ते म्हणाले, महाराष्ट्रामध्ये विस्कटत चाललेली सामाजिक विण जर अबाधित ठेवायची असेल तर सर्व जाती, धर्माच्या लोकांनी एकत्र येऊन संत आणि महापुरुषांच्या जयंती करणे काळाची गरज आहे, असे सांगितले. त्याचबरोबर गोविंद नांदेडे यांनी संतांचा विचार नित्य समाजाला तारक आहे, असे प्रतिपादन केले. सामाजिक कार्यकर्त्या अनिताताई मुंडे यांनी सुद्धा पुरुषांबरोबर स्त्रियांनीही प्रबोधनात्मक विवेकी वाचन चिंतन करणे काळाची गरज आहे, असे सांगितले. सुप्रसिद्ध कवी शिवाजी कांबळे यांनी संत

साहित्यिक आणि महापुरुष हेच खरे आपले आदर्श आहेत आणि आपण त्या मार्गाने चालले पाहिजे असे प्रतिपादन केले. प्रमुख व्याख्याते प्रा. डॉ. जायभाये यांनी 'चला संत विचारांनी महाराष्ट्र जागवूया'



या विषयाच्या अनुषंगाने तब्बल दीड तास विवेचन मांडले. त्यामध्ये गौतम बुद्ध, सॉक्रेटिस, चक्रधर, बसवन्ना आदी संतांच्या विचारांचे विवेचन करताना या सर्वांनी माणूस केंद्रस्थानी ठेवून आपला विचार प्रसार केला. नामदेव, ज्ञानदेव, जनाबाई, चोखामेळा, सावतोबा, गोरोबा आदी संतांचे कार्य विशद करताना जात–धर्म–पंथ–लिंग भेदाच्या पलीकडे या संतांनी वारकऱ्यांचा विचार मेळा जमवला. श्री विठ्ठल मंदिरामध्ये प्रवेश नसताना दुर्लक्षित, गावकुसातून आलेल्या सामान्य वारकऱ्यांनी पंढरीच्या वाळवंटामध्ये समतेची, स्वातंत्र्याची विचार पताका फडकवत असताना नाचू कीर्तनाचे रंगी ज्ञानदीप लावू जगी हा मूलमंत्र वारकरी सांप्रदायाला दिला. शांतीब्रम्ह नाथ बाबांनी श्रीक्षेत्र पैठण येथे अस्पृश्य लोकांना आपल्या वडिलांच्या वर्ष श्राद्धानिमित्त जेऊ घालून वारकरी संप्रदायाच्या समता, ममता क्रांतीला नवा विचार दिला. सतराव्या शतकामध्ये वारकरी सांप्रदायाच्या या कार्याला कळस चढवण्याचे काम संत तुकोबाराय यांनी केले. संतांची ही क्रांती सातत्याने सुरू असताना १८ आणि १९ व्या शतकामध्ये मराठवाड्यामध्ये कृतिशील समाजसुधारक संत भगवान बाबा यांचे कार्य अतुलनीय आहे. संत भगवानबाबांनी अहिंसा, समता, स्वातंत्र्य यासाठी काम करताना मिड सांगवी, भोगलवाडी, चिंचाळा आदी ठिकाणी अखंड हरिनाम सप्ताह घेऊन तेथील प्राणी हत्या बंद करून लोकांना सन्मार्गाला लावले. श्री संत भगवान बाबांनी क्रांतीसिंह नाना पाटलांच्या सोबतीने निजाम, इंग्रजांच्या विरोधामध्ये कीर्तनाच्या माध्यमातून प्रचार–प्रसार कार्य केले.

संत भगवान बाबा आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भेट झाली. त्यानंतर बाबांनी श्रीक्षेत्र भगवान गड येथे मुलांसाठी शाळा–वसतिगृह बांधून आपण फक्त कीर्तन आणि देवदेव करणारे नसून कृतिशील समाज सुधारक आहोत हे दाखवून दिले. अलीकडे समाजातील प्रेम, जिव्हाळा, आपुलकी, सौहार्द, मैत्र्यभाव लोप पावत असताना तुम्हा आम्हा सर्वांना मिळून समाजामध्ये ह्या मूलगामी गोष्टी पुन्हा नव्याने सांगण्याची वेळ आलेली आहे, असे प्रतिपादन करताना डॉ. जायभाये यांनी महापुरुषांच्या सावलीला चला गड्यांनो थांबू जरा या कवितेने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. सूत्रसंचालन मुरलीधर हंबर्डे यांनी तर आभार संतराम गित्ते यांनी मानले.

यावेळी विठ्ठल पावडे यांच्या सुमधुर आवाजात माऊलींच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात आंतरराष्ट्रीय खगोल भौतिकी परिषद

**नांदेड (प्रतिनिधी)**– स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील गणितीयशास्त्रे संकुलाच्या वतीने इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन अस्ट्रोफिजिक्स, ग्रॅव्हिटेशन अँड कॉस्मोलॉजी (आयसीएजीसी–२०२६) या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन दि. १३ व १४ फेब्रुवारी, २०२६ रोजी करण्यात आले आहे. या परिषदेसाठी आतापर्यंत देश–विदेशातील सुमारे २०० प्रतिनिधींनी नोंदणी केली असल्याची माहिती आयोजकांतर्फे देण्यात आली आहे.

ही आंतरराष्ट्रीय परिषद विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित होत असून, प्र–कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांचे विशेष



सहकार्य लाभत आहे. परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी विद्या–पीठाचे प्रभारी कुलसचिव तसेच गणितीयशास्त्रे संकुलाचे संचालक डॉ. ज्ञानेश्वर पवार हे संयोजक म्हणून कार्यरत आहेत.

या परिषदेमध्ये जपान, दक्षिण आफ्रिका व तुर्की येथील नामवंत शास्त्रज्ञ सहभागी होणार आहेत. यामध्ये डॉ. शिंजी मुकुहियामा (जपान), डॉ. एर्टन गुडेकी (तुर्की) व डॉ. अरुणकुमार बीशम (दक्षिण आफ्रिका) यांचा प्रामुख्याने समावेश आहे. तसेच देशातील अनेक नामवंत शास्त्रज्ञ व संशोधक या परिषदेला उपस्थित राहणार आहेत.

परिषदेदरम्यान खगोल–भौतिकी, गुरुत्वाकर्षण सिद्धांत, सापेक्षतावाद, विश्वरचना, कृष्णविवर, गुरुत्वीय तरंग, डार्क मॅटर व डार्क एनर्जी या अत्याधुनिक विषयांवर व्याख्याने, शोध निबंध सादरीकरण तसेच चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले आहे.

या परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी गणितीयशास्त्रे संकुलातील प्राध्यापक, संशोधक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर परिश्रम घेत असून नोंदणी, तांत्रिक व्यवस्था व शैक्षणिक सत्रांच्या नियोजनामध्ये ते सक्रिय सहभाग घेत आहेत.

# सिंधी येथील बचत गटाच्या महिलांसाठी उद्योग–व्यवसायासाठी महिला प्रशिक्षण शिबीर संपन्न

**उमरी (प्रतिनिधी)**– सिंधी येथील विविध बचत गटातील ३५ महिलांना उद्योग–व्यवसायासाठी प्रशिक्षण शिबीर घेण्यात आले. या शिबिरात महिलांना उद्योग–व्यवसायाविषयी सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

मौजे सिंधी येथील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना शेती जोड दुग्धव्यवसाय करणाऱ्यांसाठी व्हीपीके कवळे पतसंस्थेच्या माध्यमातून अल्पप्रमाणात कर्जपुरवठा वाटप करून व्यवसायाकडे वळविण्याचे काम समुहाचे अध्यक्ष मारोतराव कवळे गुरुजी यांनी केले. शेतकऱ्यांकडून तीन ते चार हजार लिटर दूध साईकृपा दूध डेअरी प्रकल्पाला दिले जाते. त्याचा खेळता पैसा दर आठवड्याला शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केला जातो. त्याच पद्धतीने गावातील महिलाही



उद्योग–व्यवसायासात उतरल्या पाहिजेत. संकल्पनेतून भारतीय स्टेट बँक ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था नांदेड व्दारा गुरुजी फाऊंडेशन व व्हीपीके पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने विनामूल्य स्वयंरोजगार प्रशिक्षण १७ जानेवारी ते ५ फेब्रुवारी पर्यंत असे २० दिवसांचे मौजे सिंधी ता. उमरी येथील सभागृहात ठेवण्यात आले. दि. १७ जानेवारी २०२६ रोजी सदर प्रशिक्षणाचे उद्घाटन सौ. पुनमताई पवार यांच्या हस्ते करण्यात आले. तर व्हीपीके उद्योग समूहाचे अध्यक्ष मारोतराव कवळे गुरुजी यांच्या अध्यक्षतेखाली प्रशिक्षण कार्यक्रम पार पडला.

यावेळी व्हीपीके उद्योग समूहाचे सीईओ तथा गुरुजी फाऊंडेशनचे अध्यक्ष संदीप पाटील कवळे, संचालिका सौ. पूजाताई पाटील जाधव, संस्थेचे उपाध्यक्ष मधुकर पाटील शिंदे, संचालक अनिल पाटील वडजे, सिंधी येथील कवळे पतसंस्थेच्या शाखाधिकारी सौ. वसूताई कवळे, एसबीआय बँकेच्या निकीता तुंबळे आदींच्या उपस्थितीत उद्घाटन करण्यात आले.

यात जवळपास ४० बचत गटातील ३५ महिलांनी या प्रशिक्षणात सहभाग घेतला. यात पापड, लोणचे, मसाले, बोटवे, द्रौण, पतरवाळी, चहा मसाला व दूध मसाला यासह अन्य उत्पादन तयार करून ते कच्च्या मालापासून पक्का माल बाजारात उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्या उद्योग व्यवसायातून आपला घर संसार थाटाने चालला पाहिजे, असे व्हीपीके उद्योग समूहाचे अध्यक्ष मारोतराव कवळे गुरुजी यांनी म्हटले.

# लोहा सार्वजनिक शिवजन्मोत्सवाची कार्यकारिणी जाहीर

**लोहा (प्रतिनिधी)**– बहुजन प्रतिपालक शिवछत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त लोहा शहरात दरवर्षीप्रमाणे याही वर्षी शिवजन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या शिवजन्मोत्सव सोहळा २०२६ साठीची कार्यकारिणी सर्वानुमते निवडण्यात आली. ज्यात अध्यक्षपदी सुधाकर पवार यांची तर कार्याध्यक्षपदी अनिल धुतमत यांची निवड करण्यात आली. उर्वरित शिवजन्मोत्सव सोहळ्याची कार्यकारिणी अशी – अध्यक्षपदी सुधाकर पाटील पवार, कार्याध्यक्ष अनिल धुतमल, उपाध्यक्ष योगेश पाटील कदम, विलास पाटील चुडावकर, सचिव गजानन पवार, सहसचिव बंटी देशमाने, कोषाध्यक्ष बालाजी पाटील कळकेकर, सहकोषाध्यक्ष अन्वर पठाण, प्रसिद्धीप्रमुख अशोक सोनकांबळे,



शिवाजी पांचाळ, गोविंद पाटील कदम, इमाम लदाफ, तर सदस्य म्हणून पप्पू बोडके यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

नांदेड जिल्ह्याचे माजी खासदार तथा लोहा–कंधार मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस तथा जिल्हा परिषद नांदेडचे माजी सभापती प्रवीण पाटील चिखलीकर, युवा नेते सचिन पाटील चिखलीकर, लोहा नगर परिषदेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष शरद पाटील पवार, लोहा नगरपरिषदेचे गटनेते तथा नगरसेवक भास्कर पाटील पवार, नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष करीम भाई शेख यांच्यासह लोहा नगर परिषदेच्या सर्व नवनियुक्त नगरसेवकांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या संपर्क कार्यालयात दि. २ फेब्रुवारी रोजी शिवजन्मोत्सव सोहळा २०२६ वर्षाच्या कार्यकारिणीची सर्वानुमते निवड करण्यात आली.

**पान १ वरून...**

**नांदेडमध्ये कविता मुळे...**

जिल्हाधिकारी तथा पीठासीन अधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या विशेष सर्वसाधारण सभेत महापौर पदाची निवडणूक होणार आहे. सकाळी ११ वाजता महापालिकेच्या सभागृहात ही विशेष सर्वसाधारण सभा होणार आहे. महापौर पदासाठी हात वर करून मतदान घेण्यात येणार आहे. यानंतर गुरूवारी नगरसेवकांची बैठक घेत महापौर निवडीबाबत नगरसेवक प्रतिनिधींची महापौर पदाबाबतची मते जाणून घेण्यात आली. दरम्यान भाजपने प्रदेश कोअर कमिटीचे नाव पुढे केले असले तरी खा. अशोकराव चव्हाण जे नाव अंतिम करतील तोच महापौर होईल हे मात्र निश्चित मानले जात होते.

राज्याचे माजी मुख्यमंत्री खा. अशोक चव्हाण यांनी गुरुवारी भाजपच्या नगरसेवकांची बैठक घेतली होती. या बैठकीमध्ये कोअर कमिटीसाठी चार नावे देण्याचा निर्णय झाला. त्यामध्ये कविता मुळे, शांभवी साले, सुदर्शना खोमणे, ज्योती कल्याणकर, वैशाली देशमुख यांच्या नावांची चर्चा होती. अखेर कविता मुळे यांच्या गळ्यात महापौरपदाची माळ पडली आहे.

भाजपचे गटनेते महेश कनकदंडे यांनी महापौर आणि आणि उपमहापौर पदासाठी प्रत्येकी आठ अर्ज विकत घेतले. काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीने एकूण ६ अर्ज तर एमआयएमने ४ अर्ज विकत घेतले होते.

# भोकर येथील ग्रामीण रुग्णालयात जागतिक कर्करोग दिन साजरा

**नांदेड (प्रतिनिधी)**– भोकर येथील ग्रामीण रुग्णालयात जागतिक कर्क रोग दिन साजरा करण्यात आला.

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. पांडुरंग पावडे, निवासी वैद्यकीय अधिकारी (बाह्य) डॉ. राजाभाऊ बुट्टे, नोडल अधिकारी डॉ. हनुमंत पाटील, जिल्हा मौखिक आरोग्य अधिकारी डॉ. कांतीलाल इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रताप चव्हाण यांच्या निरीक्षणाखाली जागतिक कर्करोग दिनानिमित्त रोगनिदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

दंत शल्य चिकित्सक डॉ. मायादेवी नरवाडे यांनी बाह्य रुग्ण विभागात रुग्णांना मौखिक कर्करोगाविषयी माहिती सांगून त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना सांगितल्या. तसेच या वर्षीचे घोष वाक्य



United for Unique म्हणजेच अद्वितीयसाठी एकजूट होऊया, हे घोषवाक्य सांगितले व सर्व रुग्णांची मौखिक तपासणी केली. तसेच एनसीडी वैद्यकीय अधिकारी डॉ. सागर रेड्डी यांनी कर्करोगाविषयी विस्तृत माहिती सांगून प्रतिबंधात्मक उपाययोजना सांगितल्या.

यावेळी डॉ. थोरवट, डॉ. मुदसीर, सहाय्यक अधीक्षक संजय देशमुख, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी बालाजी चांडोळकर, औषध निर्माण अधिकारी शिवप्रसाद जाधव, कनिष्ठ लिपीक कल्याणकर, एनसीडी समुपदेशक रेणुका भिसे, अधिपरिचारिका श्रीमती भालेराव, अधिपरिचारिका ज्योती शेंडगे, दंत सहाय्यक श्रीमती करंडेकर आदी कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

# पानसरे महाविद्यालयात क्रीडा महोत्सवाला प्रतिसाद




**अर्जापूर (प्रतिनिधी)**– पानसरे महाविद्यालयात नुकताच क्रीडा महोत्सव पार पडला. या क्रीडा महोत्सवाला विद्यार्थी, विद्यार्थिनी व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.

या स्पर्धा वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनी व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यात दि. ४ फेब्रुवारी ते ५ फेब्रुवारी दरम्यान पानसरे महाविद्यालयात यांच्यात घेण्यात आली.

या स्पर्धेत विद्यार्थी व विद्यार्थिनींनी उत्कृष्ट सहभाग नोंदविला. या क्रीडा महोत्सवात बॅडमिंटन, टेबल टेनिस, बुद्धिबळ, व्हॉलीबॉल, १०० मी,२०० मीटर धावणे, गोळा फेक, भालाफेक, लांब उडी अशा विविध खेळाचे आयोजन क्रीडा विभागामार्फत करण्यात आले. या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव बेलखेडे, संस्थेचे सदस्य अर्जुने पाटील, डॉ.गोविंद चौधरी, राजू लाभशेठवार, डॉ. गोपाल चौधरी, डॉ. मटके, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. महेश वाकरडकर आणि इतर सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

या स्पर्धेच्या बक्षीस वितरण कार्यक्रमास प्राचार्य डॉ. महादेव बेलखेडे, डॉ. अलीमुद्दीन, डॉ. कांबळे, डॉ. जाधव, डॉ. मदनुरे, डॉ. गोजे, डॉ. मरकले, डॉ. शिंदे, डॉ. शिवशेटे, डॉ. भद्रे, डॉ. इंगोले, कुंटलवार या सर्व प्राध्यापकांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी डॉ. सुनील पाटील, डॉ. मोहसीन खान, डॉ. गजानन कदम, नागनाथ यन्नावार, शेख जवाद, तुकाराम सुपेकर, मुरारी यांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन डॉ. गोपाल चौधरी यांनी केले तर उपस्थितांचे आभार डॉ. सुनील पाटील यांनी मानले.

# लोहा क्रीडा संकुलात पोलीस व सैन्य भरतीची तयारी करणाऱ्यांसाठी अद्ययावत सुविधा

- तालुका क्रीडा कार्यालय कात टाकणार
- धावण्यासाठी ट्रॅक, जिम तसेच साहित्यांसाठी हॉल उपलब्ध
- आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांची आश्वासनपूर्ती

**लोहा (प्रतिनिधी)**– लोहा नगर पालिका क्षेत्रातील बेरळी रोड लगत असलेले क्रीडा संकुल आता कात टाकणार आहे. या परिसराची स्वछता, विकास तसेच मैदानावर पोलीस व सैन्य भरतीची तयारी करणाऱ्या तरुण–तरुणींना धावण्यासाठी तत्काळ ट्रॅक तयार करून मिळणार आहे. तसेच जीमची सोय, बॅग व अन्य साहित्य ठेवण्यासाठी हॉलची व्यवस्था करण्यात येणार असून, तशा सूचना आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग व क्रीडा अधिकारी यांना दिल्या आहेत.

त्यादृष्टीने कामाला सुरुवात



झाली असून, आठ दिवसांत हे संकुल चकाचक होईल.

विधानसभा निवडणूक व त्यानंतर लोहा नगरपालिका निवडणुकीत आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी लोहा शहरात क्रीडा संकुलाचे अद्ययावतीकरण करण्याचे आश्वासित केले होते. त्यादृष्टीने आता आश्वासनपूर्ती करण्यासाठी प्रत्यक्ष कामाची सुरुवात केली जात आहे.

तालुका क्रीडा संकुलाची पाहणी करताना आ. चिखलीकर यांच्यासोबत नगराध्यक्ष शरद पवार, बांधकाम विभागाचे उपअभियंता नरमिटवार, तालुका क्रीडा अधिकारी राहूल श्रीरामवार, मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे, उपनगराध्यक्ष करिम शेख, माजी कृउबा सभापती बाबुराव केंद्रे, गटनेते भास्कर पवार, नगरसेवक पंकज परिहार, तुकाराम दाढेल, इरबाजी पवार, क्रीडा तज्ज्ञ बी. डी. जाधव, अभियंता सोमवंशी, शहर प्रमुख खंडू पवार यांच्यासह कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते.

क्रीडा संकुलात सैन्य व पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या तरुण–तरुणींसाठी धावण्यासाठी ट्रॅक, गोळा फेक, लांब उड्डी व शारीरिक चाचणी क्षमतेसाठी उपयुक्त ठरणाऱ्या सुविधा देण्यात येणार आहेत. ४ फेब्रुवारी रोजी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी बेरळी रोड लगत लोहा तालुका क्रीडा संकुलाला भेट देऊन काही सूचना केल्या. तसेच तेथे सैन्य व पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या युवक–युवतींशी त्यांनी संवाद साधला.

# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

# कीबोर्डवर ABCDE का नाहीत एका ओळीत?



**तुम्हाला माहिती आहे का कीबोर्डवरील अक्षरे एका ओळीत का लावले जात नाहीत? बहुतेक लोक म्हणतील की हे टाइपिंगचा वेग वाढवण्यासाठी आहे. तथापि, कारण अगदी उलट आहे. टाइपिंगचा वेग कमी करण्यासाठी कीबोर्डवरील शब्द ABCDE सारखे एका ओळीत लावले जात नाहीत...**

१८७० च्या दशकात पहिल्या टाइपरायटरवर शब्द ABCDE याच क्रमाने लावलेले होते. जलद टायपिंगमुळे अनेकदा टाइपरायटर जाम होत होते. यामुळे वारंवार व्यत्यय आणि विलंब होत असे. या समस्येचे निराकरण करण्यासाठी QWERTY फॉर्म्युला सादर करण्यात आला. हा फॉर्म्यूला आणणारे क्रिस्टोफर लॅथम शोल्स होते. त्यांनी E, I, T आणि A सारखी सर्वात जास्त वापरली जाणारी अक्षरे कीबोर्डवर दूर अंतरावर ठेवली. यामुळे टायपिस्टच्या बोटांना जास्त अंतर प्रवास करावा लागला, ज्यामुळे टायपिंगचा वेग थोडा कमी झाला आणि मशीन्स जाम होण्यापासून रोखले गेले. या कीबोर्ड लेआउटला नंतर QWERTY असे नाव देण्यात आले.

## कालांतराने ते का बदलले नाही?

प्रश्न उद्भवतो : कालांतराने तंत्रज्ञान सुधारत असताना कीबोर्ड लेआउट का बदलला गेला नाही? स्नायूंच्या स्मरणशक्तीमुळे हे केले गेले. व्यावहारिकदृष्ट्या, कीबोर्ड तंत्रज्ञान ABCDE स्वरुपात परत येऊ शकले असते, परंतु जगभरातील लोकांना QWERTY ची सवय झाली होती. आज जर ते बदलले तर जगातील टायपिंगची गती शून्यावर आली असती.



# इंटरनेटवर जागोजागी का भरावा लागतो CAPTCHA?

**इंटरनेटवर सर्वत्र तुम्ही मानव आहात हे सिद्ध करण्यास तुम्हाला का सांगितले जाते? आपण CAPTCHA बद्दल बोलत आहोत. जेव्हा जगात सुपरकॉम्प्युटर आणि एआयसारखे तंत्रज्ञान अस्तित्वात आहेत, तेव्हा मानवांना अस्पष्ट प्रतिमा किंवा शब्द कोडे सोडवून आपण मानव असल्याचे का सिद्ध करावे लागते? जर तुमच्या मनात हा प्रश्न उद्भवला तर आम्ही तुम्हाला सांगतो की CAPTCHA हे इंटरनेटच्या सीमेवर डिजिटल सैनिक आहेत, जे आपल्या सायबर जगाचे विनाशापासून रक्षण करतात...**

CAPTCHA कोडी सोडवणे मशीनसाठी जवळजवळ अशक्य आहे. म्हणूनच CAPTCHA आपल्याला इंटरनेटवरील बॉट्सपासून वाचवतात. CAPTCHA म्हणजे कॉम्प्युटर आणि ह्युमन्स वेगळे सांगण्यासाठी कॉम्प्लीटली ऑटोमेटेड पब्लिक ट्युरिंग टेस्ट टू टेल कॉम्प्युटर अॅन्ड ह्युमन्स अपार्ट होय. ही एक अशा प्रकारची चाचणी आहे, जी फक्त मानव पूर्ण करू शकतात, परंतु मशीन्स किंवा बॉट्स उत्तीर्ण होऊ शकत नाहीत. एक प्रकारे, कॅप्चा आपल्याला हॅकर्स आणि इंटरनेटवरील त्यांच्या बॉट्सपासून वाचवतात.

## CAPTCHAची आवश्यकता का आहे?




जे आपली हेरगिरी करू शकतात किंवा ऑनलाइन आपल्याला हानी पोहोचवू शकतात अशा स्वयंचलित प्रोग्राम किंवा बॉट्सपासून संरक्षण करण्यासाठी CAPTCHA आवश्यक आहे. CAPTCHA शिवाय हॅकर्स बॉट्स किंवा ऑटोमेटेड प्रोग्राम वापरून कोणत्याही वेबसाइटच्या टिप्पणी विभागात किंवा ईमेल सूचीमध्ये लाखो बनावट संदेश पोस्ट करू शकतात. मोठ्या सवलतीच्या दरात सेल किंवा ट्रेन तिकीट बुक करताना तुम्हाला CAPTCHA भरण्यास सांगितले जाते. हे स्क्रिप्ट किंवा बॉटला एका सेकंदात सर्व जागा किंवा वस्तू बुक करण्यापासून रोखण्यासाठी आणि खऱ्या ग्राहकांना संधी देण्यासाठी आहे. त्याचप्रमाणे, हॅकर्स बॉट्सचा वापर करून तुमचा पासवर्डचा अंदाज लावण्यासाठी लाखो संयोजने वापरून पाहतात. अशा परिस्थितीत, CAPTCHA बॉट्सना तुमचा पासवर्ड अंदाज लावण्यापासून रोखतो. कारण ते तो सोडवू शकत नाहीत.

# वाहनाचे आरसी हरवले किंवा फाटले?

## मोबाइल फोनवर त्वरित डिजिटल प्रत मिळवा, वाहन 4.0 करेल मदत




**बऱ्याचदा वाहनाचे आरसी म्हणजेच नोंदणी प्रमाणपत्र, हरवले किंवा फाटले जाते. खरं तर आजही अनेक राज्यांमध्ये, स्मार्ट कार्ड आरसीऐवजी कागदी स्लिपच्या स्वरुपात आरसी जारी केले जातात. अशा परिस्थितीत तुम्हाला आरटीओ कार्यालयात जाण्याची आवश्यकता नाही. वाहन ४.० द्वारे तुम्ही घरच्या घरी आरामात काही मिनिटांत तुमच्या आरसीची डिजिटल प्रत मिळवू शकता. अधिक वेळ न घालवता, हे कसे करायचे ते समजून घेऊया...**

- वाहन ४.० म्हणजे काय? : वाहन ४.० हे वाहन नोंदणी आणि संबंधित प्रक्रिया सुलभ करण्यासाठी बनवलेले प्लॅटफॉर्म आहे. ते भारत सरकारच्या रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने (MoRTH) विकसित केले आहे. हा प्लॅटफॉर्म देशभरात एकाच डेटाबेसचा वापर करतो. यामुळे वेगवेगळ्या राज्यांमधील आरटीओमध्ये डेटा शेअरिंग करणे सोपे आणि पारदर्शक होते.
- वाहन ४.० कशासाठी वापरले जाते? : वाहन ४.० चा वापर वाहन नोंदणी, मालकी हस्तांतरण, रोड टॅक्स पेमेंट, फिटनेस सर्टिफिकेट, परमिट जारी करणे आणि गहाणखत (आरसीमधून वाहन कर्जाची माहिती जोडणे किंवा काढून टाकणे) अशा विविध कारणांसाठी केला जाऊ शकतो.
- डिजिलॉकर देखील वापरू शकता : जर तुम्हाला आवडत असेल, तर तुम्ही डिजिलॉकर अॅप डाउनलोड करून तुमच्या फोनवर तुमचा आरसी सहजपणे मिळवू शकता. प्रथम, डिजिलॉकरमध्ये लॉग इन करा. नंतर वाहन नोंदणी शोधा आणि तुमचे राज्य निवडा. नंतर नोंदणी क्रमांक आणि चेसिस क्रमांक प्रविष्ट करा. तुमच्या आरसीची डिजिटल प्रत आता तुमच्या फोनवर डाउनलोड केली जाईल.

## आरसीची डिजिटल प्रत कशी डाउनलोड करावी?

जर तुम्हाला तुमचा आरसी ताबडतोब मिळवायचा असेल, तर तुम्ही वाहन ४.० वापरून ते डाउनलोड करू शकता. हे करण्यासाठी, तुम्हाला तुमच्या संगणकावर किंवा फोनवर गुगलवर 'आरसी डाउनलोड' लिहावे लागेल. त्यानंतर, निकालांमधील पहिल्या लिंकवर म्हणजे 'वाहन ४.०' वर क्लिक करा. आता तुमचा नोंदणी क्रमांक आणि तुमच्या चेसिस क्रमांकाचे शेवटचे पाच अंक प्रविष्ट करा. तुमच्या नंबरवर ओटीपी पाठवून तुमची ओळख पडताळली जाईल. तुमचा आरसी नंतर पीडीएफ म्हणून डाउनलोड केला जाईल.

# अजब-गजब

# महाकाय कैदी, जेल तोकडे!

एम्सटर्डम : गुन्ह्याची शिक्षा म्हणून गुन्हेगारांना तुरुंगवास सुनावला जातो. पण काही गुन्हेगारांना तुरुंगात ठेवणे सरकारसाठी डोकेदुखी ठरते. त्यांच्या खाण्यापिण्याचा आणि राहण्याचा खर्चच इतका वाढतो की त्यांची मुक्तता करणे योग्य समजले जाते. सध्या नेदरलॅन्डचे सरकार अशाच एका गुन्हेगारामुळे परेशान आहेत. हा गुन्हेगार इतका महाकाय शरीराचा आहे, की त्याला जेलची खोली कमी पडते. त्यांची उंची सहा फूट नऊ इंच लांब आणि वजन 228 किलो आहे. जेलमध्ये त्याला नेहमी वाकूनच चालावे लागते. यामुळे त्याच्या खाण्या-पिण्याची बडदास्त ठेवताना तुरुंग प्रशासन वैतागून गेले असून, त्यांनी त्याला दुसरीकडे हलवावे, अशी मागणी केली आहे. एंजेलो मॅक डी असे या कैद्याचे नाव आहे. बाथरूम ठेंगणे असल्याने तो मोकळ्या वातावरणातच आंघोळीचा आनंद घेतो. उंचीला साजेशी झोपण्याची खोली नसल्याने त्याला ओरंड्यात झोपवले जाते. चार ते पाच लोकांचे जेवण तो एकटे करत असल्याने जेलच्या स्वयंपाकघराचे नियोजन बिघडले आहे. त्याची व्यवस्था ठेवता येत नसल्यामुळे तुरूंगाधिकाऱ्यांनी या कैद्याला दुसऱ्या मोठ्या जेलमध्ये हलवावे, अशी मागणी सरकारकडे केली. पण त्यांची मागणी कुणी गांभीर्याने घेतल्याचे दिसत नाही. दुसरीकडे ही बाब कैद्याच्या वकिलाने न्यायालयाला सांगितली आहे. आपल्या पक्षकाराची जेलमध्ये गैरसोय होत असल्याचे त्याने न्यायालयाला सांगितले. त्याची शिक्षा कमी करावी, असे आम्ही म्हणत नाही पण त्याची गैरसोय करू नये, अशी विनंती असल्याचे त्याचे वकिल न्यायालयाला म्हणाले. आता या कैद्याला आरामात राहता येईल, असे जेल कुठे आहे, याची माहिती न्यायाधीश घेत आहेत. त्यानंतर त्याला या जेलमधून हलविण्यात येईल, अशी शक्यता आहे. त्याला कधी एकदा हलविले जाते, याची वाटच तुरुंगाधिकारी पाहत आहेत.



# सोलर पॉवरद्वारे युवकाने दिले सूर्याला आव्हान!



न्यूयॉर्क : अमेरिकेच्या इंडियाना शहरातील एका 19 वर्षांच्या युवकाने थेट सूर्यालाच आव्हान देण्याचे काम केले आहे. फायबरपासून बनलेल्या सॅटेलाईट डिशवर त्याने 5, 800 आरशाचे तुकडे चिपकवले आणि दावा केला की, त्यातून 5 हजार सूर्याइतकी उष्णता बाहेर पडते. त्याचा दावा खराही ठरला असून, लोखंडाला वितळण्याची क्षमता त्याच्या सोलर पॉवरमध्ये आहे, हे सिद्ध झाले आहे. एरिक जॅकमेन याने ही किमया करून दाखविली आहे. त्याने केलेले हे अनोखे उपकरण सध्या लाखो लोक यू ट्यूबवर बघत आहेत. सर्वांनी त्याच्या हुशारीला दाद देतानाच आश्चर्य व्यक्त केले आहे. एरिकने सांगितले की, या सोलर पॉवरमधून निघणाऱ्या ऊर्जेद्वारे अॅल्युमिनियमची वाफ होते तर लोखंड वितळते. दगड आणि मातीचा लाव्हारस तयार होतो. तो केवळ बोलूनच थांबला नाही तर त्याने प्रत्यक्षात प्रयोगही करून दाखवला. काही लोकांनी संशय व्यक्त केला आहे की हे सॅटेलाईट पॉवरने होऊ शकते. एरिकने आपल्या संशोधनाला आर 5800 सोलर डेथ रे असे नाव दिले आहे. त्यातून एक मिनिटात सूर्याकडून वर्षभर मिळते तेवढी ऊर्जा मिळते, असे तो सांगतो.



# पुन्हा रहस्यमयी घर काढले विक्रीला!

मेरीलॅन्ड : येथील एक रहस्यमयी घर पुन्हा एकदा विक्रीला काढण्यात आले असून, या घराची किंमत अवघी 15 हजार डॉलर लावण्यात आली आहे. तीन खोल्यांच्या या टूमदार घरासमोर एक मोठे गार्डन आहे. पण या घरात आतापर्यंत तीन हत्या झाल्या आहेत. या घराला विकत घेणारा शेवटचा मालक ब्रायन बेट होता. तो एका माध्यमिक शाळेत प्राचार्य होता. त्याची हत्या एका युवकाने केली होती. त्याआधीही या घरात 2003 मध्ये दोन हत्या एकाच वेळी झाल्या होत्या. या घराला भुताने पछाडले असल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. खून झालेल्या तिघांचेही आत्मे घरात अजूनही वास्तव्य करताहेत, असे नागरिक म्हणतात. रात्रीनंतर या घराजवळून कुणी जात नाही. या घरातून नागरिकांनी अनेकदा किंचाळण्याचे आवाज ऐकले आहेत. घर सध्या प्राचार्य ब्रायन यांच्या मुलाच्या नावावर त्यानेच ते विकायला काढले आहे. घराचा इतिहास खरेदीदाराला सांगण्याची कोणतीही अटक कायद्याने त्याला घातलेली नाही. पण तरीही घराची कुप्रसिद्धी इतकी झाली आहे, की त्याने नाही सांगितले तरी खरेदीदाराला घराचा इतिहास माहीत होणार आहेच. त्यामुळे हे घर विकत घेण्याचे धाडस कुणी करणार नाही, हे उघडच आहे.

# आता शंभरातून 9 प्रियकरच लिहितात प्रेमपत्र!

लंडन : एक काळ होता जेव्हा प्रियकर आपल्या प्रेयसीला प्रेमपत्र लिहून कबुतराच्या मार्फत पाठवायचा... नंतरच्या काळात टपालाने प्रेमपत्र पाठविले जायचे. घराजवळच प्रेयसी राहत असेल तर कुणी बघणार नाही, याची दक्षता घेऊन तिच्याकडे गुपचूप पत्र फेकण्याचेही काम व्हायचे... पण आता तेही काळाच्या पडद्याआड गेले आहे. आता संगणक, मोबाईलच्या माध्यमातून प्रेमपत्र प्रेयसीपर्यंत पोहचते आणि तातडीने प्रत्युत्तरही येते. तरूणाईमध्ये हा बदल इतका झाला आहे की आता शंभरातून केवळ 9 जणच प्रेमपत्र लिहित असल्याचा निष्कर्ष एका सर्वेक्षणातून काढण्यात आला आहे. डेली एक्स्प्रेस या ब्रिटनमधील आघाडीच्या इंग्रजी दैनिकात आलेल्या वृत्तानुसार, तीन हजार लोकांवर हे सर्वेक्षण करण्यात आले. त्यात केवळ 9 टक्के लोकांनी प्रेमाची कबुली आपण प्रेमपत्र लिहून दिल्याचे सांगितले. या 9 टक्के लोकांतही अर्ध्याहून अधिक लोक 50 वर्षांच्या आसपासच्या वयाचे होते. सुमारे 67 टक्के लोकांनी मोबाईलच्या माध्यमातून आपण प्रेमाची कबुली दिल्याचे सांगितले. त्यासाठी एसएमएसचा वापर केल्याचे ते म्हणाले. 24 टक्के लोकांनी आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी इंटरनेटचा वापर केला. यातील 14 टक्के लोकांनी फेसबुकसारख्या सोशल नेटवर्किंग साइटद्वारे थेटपणे प्रेम व्यक्त केले तर बाकीच्यांनी ई-मेलचा वापर केला. प्रत्येक पाचव्या व्यक्तीने व्हिडिओ कॉलिंग सुविधेद्वारे आपल्या प्रियकर किंवा प्रेयसीसोबत संबंध प्रस्थापित केल्याचेही मान्य केले.

# एक गाव म्हाताऱ्यांचे... सर्वांत कमी वयाचा माणूस आहे 65 चा!

लंडन : एखाद्या गावात तरूण जास्त असतात तर एखाद्या गावात महिला... काही गावांत म्हाताऱ्यांची संख्या मोठी दिसते. पण एखादे असे गाव आहे की जिथे केवळ म्हातारेच राहतात? म्हणजे अगदी तरूणांचे नामोनिशानही नाही... आश्चर्य वाटले ना? पण आहे असे एक गाव. जिथे केवळ म्हातारेच राहतात. त्या गावात सर्वांत कमी वयाचा माणूस आहे तब्बल 65 वर्षांचा. त्यामुळे तरूण शोधूनही सापडत नाही.

स्पेनमध्ये हे गाव असून, जगातील हे म्हाताऱ्यांचे एकमेव गाव आहे. ओलमेडा डी ला क्यूएस्टा असे गावाचे नाव आहे. गेल्या 40 वर्षांपूर्वी या गावात शेवटच्या मुलाने जन्म घेतला होता. या गावाची अशी परिस्थिती कशामुळे झाली, याला कारण आहे. त्याबद्दल गावातील एक रहिवाशी 82 वर्षीय आरटुरो रिगेचो मेटियो यांनी सांगितले, की 1940 मध्ये गावात 500 लोक राहत होते. मात्र काम शोधण्यासाठी ते बाहेर गेले आणि परतलेच नाहीत. त्यामुळे गावात केवळ म्हातारी मंडळीच उरली आहे. गावात तरूणांनी येऊन राहावे आणि गावाची शान वाढावी, यासाठी अनेकांनी आपले प्लॉट स्वस्तात विक्रीला काढले आहेत. पण तरूणांकडून कोणताही प्रतिसाद मिळत नाही. मेड्रिड शहरापासून 100 मैलाच्या अंतरावरील या गावात सध्या केवळ 15 कुटुंबं राहतात. पूर्वी लोक शेतात काम करून पोट भरायचे. पण शेतीवर अवलंबून कुटुंबाचा उदरनिर्वाह भागत नसल्याने लोकांनी गाव सोडून शहरात कामधंदा बघितला आणि ते तेथेच राहायला गेले. गावात राहणारी म्हातारी मंडळी आपल्या प्रियजणांचे स्मरण करून दिवस काढतात. कधी एकदा मरण येते आणि डोळे मिटतो, असे सर्वांना झाल्याचे मेटियो म्हणाले.



# ‘हिंद-दी-चादर’ कार्यक्रमासाठी सुरक्षा व सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात - मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी

## प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्री अमित शाह यांची विशेष उपस्थिती; नवी मुंबईत भव्य कार्यक्रम

**मुंबई (प्रतिनिधी)-** ‘हिंद-दी-चादर’ श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागमाचा भव्य कार्यक्रम २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२६ रोजी नवी मुंबईतील खारघर येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. देशभरातून लाखो भाविक या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. या पार्श्वभूमीवर कार्यक्रमाच्या तयारीस गती देत सुरक्षा, पाणीपुरवठा, भोजन, निवास, वाहतूक, स्वच्छता आदी बाबींची चोख व्यवस्था करण्याचे निर्देश मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ.श्रीकर परदेशी यांनी दिले.



‘हिंद-दी-चादर’ श्री गुरू तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह गोवा राज्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, राजस्थानचे मुख्यमंत्री भजन लाल शर्मा, आसामचे मुख्यमंत्री डॉ. हिमांता बिस्वा सरमा उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीसाठी मंत्रालयात बैठक झाली. यावेळी राज्य समन्वय समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक, नवी मुंबईचे उपजिल्हाधिकारी तथा कार्यक्रमाचे समन्वयक रविंद्र राठोड, समितीचे शासकीय समन्वयक डॉ. जगदीश सकवान, मुख्यमंत्री कार्यालयाचे अवर सचिव तुषार राठोड यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

तर, दूरदृश्य प्रणालीद्वारे कोकण, पुणे, नाशिक विभागाचे आयुक्त, मुंबई शहर, उपनगर, ठाणे, रायगड, पालघर, सिंधुदूर्ग, रत्नागिरी, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, अहिल्यानगर, नाशिक, जळगाव, धुळे, नंदूरबारचे, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस आयुक्त, पोलीस अधिक्षक, परिवहन आयुक्त, महानगरपालिकेचे आयुक्त यांच्यासह संबंधीत अधिकारी उपस्थित होते. प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी म्हणाले की, नागपूर आणि नांदेड येथील कार्यक्रम लाखो भाविकांच्या उपस्थित यशस्वीरित्या झाला आहे. या कार्यक्रमात सिख, सिकलकर, बंजारा, लबाना, सिंधी, महोयाल, वाल्मिकी, उदासीन, भगत नामदेव (वारकी) संप्रदायासह नागरिकही मोठ्या संख्येने गुरू तेग बहादुर यांचा इतिहासाला उजाळा देण्यासाठी एकत्र येतात. नवी मुंबई येथील कार्यक्रमातही दहा लाख भाविक राज्य तसेच देशातून अपेक्षित आहेत. या अनुषंगाने वाहतुक, स्वच्छता, लंगर, पाणी पुरवठा, मैदान, धर्मशाळा, निवासव्यवस्था, पिण्याचे पाणी, सुरक्षा व्यवस्था, फिरते स्वच्छतागृह, नि:शुल्क शटल बससेवा या सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात. समन्वयक रामेश्वर नाईक म्हणाले की, ‘हिंद-दी-चादर’ श्री गुरू तेग बहादुर यांच्या शहीदीच्या स्मृतीस उजाळा देण्यासाठी आयोजित कार्यक्रमाअंतर्गत शाळा, महाविद्यालये, निवासी शाळा, शिक्षण संस्था येथे विद्यार्थ्यांमार्फत प्रभातफेरी काढण्यात येते, घोषवाक्य, निबंध स्पर्धा तसेच डॉक्युमेंट्री बनविण्यात येणार आहे. सतिंदर सरताज यांचे भक्तिगीत सिनेमागृहात प्रदर्शीत करण्यात येत आहे. सर्व जिल्ह्यांमध्ये डिजिटल प्रचार रथ, संत प्रवास वाहने, जागरण, प्रचार व प्रसार समित्या यांच्यामार्फत गुरू तेग बहादुर आणि त्यांच्या परिवाराच्या शहीदीचा इतिहास जनमानसात पोहोचविण्यात येत आहे.

https://gurutegbahadurshahidi.com या संकेतस्थळावर कार्यक्रमाची संपुर्ण माहिती देण्यात आली आहे. नऊ समाज या कार्यक्रमाच्यानिमित्ताने एकत्र येत असून, या कार्यक्रमाच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. या कार्यक्रमात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहनही त्यांनी केले.

# उत्पन्न वाढीसाठी एस.टी. बसेस फेऱ्यांचा वक्तशीरपणा वाढवा - परिवहन मंत्री सरनाईक



**मुंबई (प्रतिनिधी) –** बसेस वेळेवर धावल्या तरच उत्पन्नाची चाके वेगाने फिरतील, असे परिवहन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी सांगितले. मंत्रालयातील दालनात आयोजित उत्पन्नवाढ आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीला एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर यांच्यासह सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले की, एसटी ही सर्वसामान्यांची जीवनवाहिनी आहे. किफायतशीर दर, सुरक्षित प्रवास आणि शासनाच्या विविध सवलतींमुळे प्रवाशांचा ओघ वाढत असताना सेवेत वक्तशीरपणा नसेल तर ही वाढ टिकणार नाही. त्याचबरोबर, प्रवाशांना ताटकळत ठेवणे म्हणजे त्यांना पर्याय शोधायला भाग पाडणे आहे. दैनंदिन प्रवासात बसेस उशिरा सुटणे, रस्त्यात बंद पडणे किंवा अचानक फेऱ्या रद्द होणे, अशा तक्रारी असतात.

यासाठी आगार पातळीवरील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी अधिक जबाबदारीने काम करून प्रत्येक फेरी नियोजित वेळी सुटेल याची खात्री करावी. प्रत्येक वेळेवर सुटणारी बस म्हणजे वाढत्या उत्पन्नाकडे जाणारे एक पाऊल आहे. वक्तशीरपणाचा थेट संबंध महसुलाशी आहे. वारंवार होणाऱ्या उशिरामुळे हक्काचा प्रवासी खाजगी पर्यायांकडे वळतो, ही बाब गंभीर असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

एसटीचा वाढता दैनंदिन खर्च लक्षात घेता, उत्पन्नवाढीसोबतच काटकसरीचे धोरण काटेकोरपणे राबवण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. स्थानिक पातळीवर नियोजनबद्ध देखभाल, संसाधनांचा कार्यक्षम वापर आणि व्यवस्थापनातील शिस्त यावर भर देण्याचे निर्देश त्यांनी दिले. वक्तशीरपणा हीच एसटीची ओळख ठरली पाहिजे, यादृष्टिने एसटी प्रशासनाने सज्ज होण्याचे निर्देश मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले. प्रवाशांचा विश्वास जपणारी, वेळेवर धावणारी आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम होणारी एसटी, हाच पुढील वाटचालीचा मंत्र असल्याचेही मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

# सर्वोच्च न्यायालयाने अल्पवयीन मुलीला गर्भपाताची परवानगी दिली: स्त्रीला गर्भधारणा सुरू ठेवण्यासाठी भाग पाडू शकत नाही

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी १७ वर्षांच्या एका अल्पवयीन मुलीच्या ३० आठवड्यांच्या गर्भधारणेला वैद्यकीय समाप्तीची परवानगी दिली. न्यायालयाने म्हटले की, कोणत्याही महिलेला विशेषतः अल्पवयीन मुलीला तिच्या इच्छेविरुद्ध गर्भधारणा सुरू ठेवण्यास भाग पाडले जाऊ शकत नाही.

न्यायमूर्ती बी.व्ही. नागरत्ना आणि न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान यांच्या खंडपीठाने मुंबई उच्च न्यायालयाचा आदेश रद्द केला. न्यायालयासमोर एका अल्पवयीन मुलीचे प्रकरण होते, जी शेजारच्या एका मुलासोबतच्या संबंधातून गर्भवती झाली होती आणि तिने आपली गर्भधारणा समाप्त करण्याची मागणी केली होती.

न्यायालयाने मुंबईतील जे.जे. रुग्णालयाला निर्देश दिले की, त्यांनी आवश्यक खबरदारी घेऊन मुलीचा वैद्यकीय गर्भपात करावा.



वैद्यकीय मंडळाच्या अहवालात म्हटले होते की, जर गर्भधारणा पूर्ण काळासाठी सुरू ठेवली तर आई आणि बाळाच्या जीवाला तात्काळ कोणताही धोका नाही. याउलट, न्यायालयाने म्हटले की, आईची इच्छा आणि तिच्या शरीरावरचा तिचा अधिकार सर्वात महत्त्वाचा आहे. जर एखादी महिला विशेषतः अल्पवयीन मुलगी गर्भधारणा सुरू ठेवू इच्छित नसेल, तर न्यायालय तिला भाग पाडू शकत नाही. न्यायालयाने प्रश्न उपस्थित केला की, जेव्हा २४ आठवड्यांपर्यंत गर्भपाताची परवानगी असू शकते, तर मग ३० आठवड्यांत का नाही? अनेकदा एखाद्या महिलेला गर्भधारणा संपुष्टात आणायची आहे की नाही, हे ठरवण्यासाठी वेळ लागतो.

न्यायमूर्ती नागरत्ना म्हणाल्या की, जर न्यायालये अशा प्रकरणांमध्ये वैद्यकीय गर्भपाताची परवानगी देत नसतील, तर महिलांना बेकायदेशीर आणि असुरक्षित मार्गांचा अवलंब करण्यास भाग पाडले जाईल. त्या बोगस डॉक्टरांकडे जातील, जे खूप धोकादायक ठरू शकते. महाराष्ट्र सरकारच्या वतीने हजर असलेल्या वकिलांनी युक्तिवाद केला की, मुलाच्या जन्मानंतर त्याला अनाथाश्रमात ठेवता येते, परंतु न्यायालयाने म्हटले की, हा पर्याय अल्पवयीन मुलीच्या इच्छेवर वरचढ ठरू शकत नाही. सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, ते रुग्णालयासाठी आदेशाचा ऑपरेटिव्ह भाग तात्काळ जारी करत आहेत, तर सविस्तर आदेश नंतर दिला जाईल.

# केंद्र सरकारच्या विविध योजनांमुळे भारताची जागतिक महासत्तेकडे वाटचाल

## स्वारातीमवि नांदेडचे प्र. कुलगुरू डॉ.अशोक महाजन यांचे प्रतिपादन

**अहमदपूर (प्रतिनिधी)-** भारत सरकारने विकसित भारत २०४७ चे स्वप्न पूर्ण करण्यासाठी विविध लोक कल्याणकारी योजना सुरू केल्या आहेत. त्या आधारावर भारत सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, संरक्षण, विज्ञान-तंत्रज्ञान आदीं क्षेत्रामध्ये विशेष प्रगती करीत आहे, यातूनच भारताने जागतिक महासत्तेकडे देदीप्यमान वाटचाल सुरू केली असून प्राचीन काळातील विश्वगुरू भारत पुन्हा एकदा जगाचे नेतृत्व करेल, असे स्पष्ट प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड चे प्र. कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांनी केले.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, येथील महात्मा फुले महाविद्यालयात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या तसेच किसान शिक्षण प्रसारक मंडळ उदगीरचे माजी अध्यक्ष कै. अशोकराव पाटील एकंबेकर यांच्या ७५ व्या जयंती निमित्त’ जागतिक गावाक्षातून विकसित भारत - २०४७’ या विषयावर एकदिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या चर्चासत्राच्या समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चर्चासत्राचे संयोजक व लेखक प्राचार्य डॉ वसंत बिरादार हे होते. तर किसान प्रमुख उपस्थितीत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे प्र- कुलगुरू डॉ. अशोक महाजन हे होते.तर विशेष निमंत्रित मार्गदर्शक तोकुसिमा विद्यापीठ जपानच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील प्रो. डॉ. रिषी मुराकामी हे होते. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या सामाजिक शास्त्र विभागाचे संचालक प्रो. डॉ. प्रमोद लोणारकर, विविध उपस्थितीत अहमदपूरच्या एमजी कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही.पी. पवार, आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे संयोजक उपप्राचार्य प्रो. डॉ. दुर्गादास चौधरी, सहसंयोजक प्रो. डॉ. अभिजीत मोरे, छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्राचे संचालक डॉ. बब्रुवान मोरे आदींची उपस्थिती होती.




यावेळी पुढे बोलतांना प्र. कुलगुरू डॉ. अशोक महाजन म्हणाले की, भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही प्रधान देश असून भारत सरकारने तसेच विविध राज्य सरकारने लोककल्याणकारी योजना राबविल्या असून त्यामध्ये भारत सरकारच्या आत्मनिर्भर भारत, स्टार्ट ऑफ इंडिया, मेक इन इंडिया, उज्ज्वला गॅस योजना, प्रधानमंत्री जनधन योजना, प्रधानमंत्री फसल बीमा योजना, अटल पेन्शन योजना, आयुष्यमान भारत, प्रधानमंत्री आवास योजना, प्रधानमंत्री सूर्य घर योजना, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना याबरोबरच डिजिटल इंडिया व स्त्री विकासासाठी महिला सबलीकरण, लाडली बहीण योजना, महिला समृद्धी योजना आदी केंद्र सरकार राबवीत असून या योजनांचा फायदा भारतीयांच्या जीडीपी वाढीबरोबरच सर्वांगीण विकासासाठी होत आहे, असेही ते म्हणाले.

या प्रसंगी डॉ. रिषी मुराकामी म्हणाले की, भारताच्या सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्राचा जगाने आदर्श घेतला आहे. वैश्विकरणाच्या युगामध्ये भारताने मोठ्या प्रमाणात प्रगती केली असून संपूर्ण जगाचे लक्ष भारताकडे लागून आहे. प्राचीन साहित्याचा वारसा हा जगासाठी जागतिक वारसा सिद्ध झाला असून त्या आधारावर विज्ञानाने प्रगती केली व जपान प्रमाणे भारत तंत्रज्ञानात विकसित राष्ट्र झाले आहे, असेही ते म्हणाले.

यावेळी चर्चासत्रात सहभागी झालेल्या डॉ. राजश्री जाधव, डॉ. शिवाजी देवनाळे, डॉ. पांडुरंग पांचाळ आदींनी प्रातिनिधिक स्वरूपात चर्चासत्राच्या अनुषंगाने मनोगत व्यक्त केले. या समारोप कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप चर्चासत्राचे संयोजक प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांनी केला. या आंतरराष्ट्रीय चर्चासत्राच्या समारोप कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मनीषा झोल यांनी तर आभार प्रा. सुमीत कुमठेकर यांनी मानले. या चर्चासत्रासाठी महाराष्ट्रसह देशभरातून दीडशेहून अधिक संशोधक विद्यार्थी, प्राध्यापक, अभ्यासक उपस्थित होते.

# राज्यातील शेतजमिनींच्या पोटहिश्शांची आता मोजणी

**मुंबई (प्रतिनिधी) –** राज्यातील ग्रामीण भागातील शेतजमिनींच्या नकाशा तसेच ७/१२ उतारामधील तफावत दूर करण्यासाठी महसूल विभागाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या विशेष पुढाकाराने राज्यातील शेतजमिनींच्या पोटहिश्शांची मोजणी करून नकाशे आणि अधिकार अभिलेख (७/१२) अद्ययावत करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून आता जमिनींचे प्रलंबित वाद मिटण्यास मदत तर होईलच शिवाय, प्रत्येक भूखंडाला आता 'भू-आधार' क्रमांक (णडझखछ) मिळणार आहे.

राज्यात १८९० ते १९३० या काळात पहिली भूमापन प्रक्रिया झाली होती. त्यानंतर १९९२ पासून डिसेंबर २०२४ पर्यंत खरेदी-विक्री, वारस हक्क किंवा वाटणीमुळे तब्बल २ कोटी १२ लाख ७६ हजार ४९९ नवे पोटहिस्से तयार झाले आहेत. मात्र, या सर्व पोटहिश्शांची प्रत्यक्ष मोजणी न झाल्याने सरकारी दप्तरी नकाशे आणि ७/१२ उतारा यांचा ताळमेळ लागत नव्हता. ही अडचण दूर करण्यासाठी जमाबंदी आयुक्त, पुणे यांच्या स्तरावरून आता 'पोटहिस्सा मोजणीचा पथदर्शी प्रकल्प' सुरू करण्यात येत आहे.

केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, प्रत्येक जमिनीच्या तुकड्याला आता Unique Land Parcel Identification Number (ULPIN) म्हणजेच 'भू-आधार' क्रमांक दिला जाणार आहे. आधार कार्डाप्रमाणेच जमिनीची सर्व माहिती या एका क्रमांकावर उपलब्ध असेल. यामुळे पीक विमा, बँकांकडून कर्ज मिळवणे आणि सरकारी योजनांचा लाभ घेणे शेतकऱ्यांसाठी अधिक सोपे होणार आहे.

पाकिस्तान- शिया मशिदीत शुक्रवारच्या नमाजादरम्यान स्फोट:

# इस्लामाबादमध्ये झालेल्या आत्मघाती हल्ल्यात ३१ जणांचा मृत्यू, १६९ जखमी

**इस्लामाबाद**–पाकिस्तानची राजधानी इस्लामाबादमधील शिया मशिदीत शुक्रवारच्या नमाज दरम्यान आत्मघाती बॉम्बस्फोट झाला. पाकिस्तानी वृत्तपत्र द डॉननुसार, या हल्ल्यात ३१ जणांचा मृत्यू झाला आणि १६९ जण जखमी झाले. यापूर्वी, पाकिस्तानी माध्यमांच्या वृत्तामध्ये ६९ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती होती.

पोलिस आणि बचाव पथके घटनास्थळी पोहोचली आहेत आणि मदत कार्य सुरू केले आहे. रुग्णालयांना सतर्क ठेवण्यात आले आहे आणि जखमींना तेथे नेण्यात येत आहे. इस्लामाबादच्या पोलिस प्रमुखांनी शहरात आणीबाणीची घोषणा केली आहे. मृतांची संख्या वाढण्याची भीती अधिकाऱ्यांना आहे. अद्याप कोणत्याही गटाने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारलेली नाही. पाकिस्तानचे राष्ट्रपती आसिफ अली झरदारी यांनी स्फोटात मृत्युमुखी पडलेल्यांबद्दल शोक व्यक्त केला. ते म्हणाले की, निष्पाप लोकांना लक्ष्य करणे मानवतेच्या विरोधात आहे.

जखमींच्या जलद पुनर्प्राप्तीसाठी झरदारी यांनी प्रार्थना केली आणि अधिकाऱ्यांना त्यांना सर्वोत्तम वैद्यकीय सेवा देण्याचे निर्देश दिले. मंत्री म्हणाले- अशा घटना देशाचे मनोबल तोडू शकत नाहीत. पाकिस्तान सरकारचे मंत्री डॉ. तारिक फजल चौधरी यांनी सोशल मीडियावर लिहिले की, मी इस्लामाबादमधील स्फोटाचा तीव्र निषेध करतो. जीवितहानीमुळे मला दुःख झाले आहे. अशा दहशतवादी घटना देशाचे आणि तेथील लोकांचे मनोबल तोडू शकत नाहीत. शांतता, सहिष्णुता आणि स्थिरतेसाठी आपण सर्वांनी एकत्र आले पाहिजे आणि कायदा अंमलबजावणी संस्थांसोबत खंबीरपणे उभे राहिले पाहिजे.


MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

## E-Tender Notice (Corrigendum)

The Executive Engineer,MSEDCL,Nanded Urban Division on behalf of MSEDCL (The Employer) invites sealed e-tenders from reputed & e-registered agencies/bidders for following various work.The details are as given below:

| Sr. No. | Tender No | Tender Description | Work Area | Tender Purchasing Cost (including GST) | EMD in Rupees |
|---|---|---|---|---|---|
| 1. | EE/UD/NND/NSC/T-01/2026-27 | Empanelment of Agencies for Infrastructure development for release of new connections/ enhancement of load (RCI and others except Ag) in Nanded Urban Division,Nanded Circle. | All Subdivision Under Nanded Urban Division | Rs. 11800/- | Rs. 25,000/- |
| 2. | EE/UD/NND/BM-HT/T-02/2026-27 | Empanelment of Agencies for Breakdown Maintenance of HT overhead lines and underground cables in Nanded Urban Division Nanded Circle. | All Subdivision Under Nanded Urban Division | Rs. 1180/- | Rs. 10000/- |
| 3. | EE/UD/NND/BM-LT/T-03/2026-27 | Empanelment of Agencies for Breakdown Maintenance of LT overhead lines, LT underground cables, & Fuse calls Nanded Urban Division Nanded Circle. | All Subdivision Under Nanded Urban Division | Rs. 1180/- | Rs. 10000/- |
| 4. | EE/UD/NND/BM-DTC/T-04/2026-27 | Empanelment of Agencies for for Breakdown Maintenance of Distribution transformer centre in NANDED URBAN DIVISION, NANDED CIRCLE. | All Subdivision Under Nanded Urban Division | Rs. 1180/- | Rs. 10000/- |

The tenders will be processed only in electronics tendering mode & opened for registered agencies on e-trendering system for works contract of MSEDCL. The bid documents will be available from **date. 31.01.2026 to 11.02.2026** upto **17:00 Hrs.** The last date of uploading of e-tenders is **date.12.02.2026** upto **11:00 Hrs.** For more details regarding registration process & tender visit our company's e-tendering website: **https://www.mahadiscom.in**

The undersigned reserves all the rights to accept or reject any or all tenders without assigning any reason thereof.

contact details: **Kiran Pankaj Deshmukh (I/c Add. Exe. Engg.)** contact details: **7875473667**

**Sd/-**
**Executive Engineer**
**MSEDCL Urban Division, Nanded**

**PRO No. 007 Dt. 30.01.2026.**



**जाहिर प्रगटन**

बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात,
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१०/ २०२६** पुढील तारीख - १७.०२.२०२६

अर्जदार : ०१. स्वाती रामराव कुलकर्णी , वय - ४५ वर्षे, व्यवसाय - घरकाम,
रा. मारवाडी गल्ली , कुंडलवाडी, ता. बिलोली जि. नांदेड.
०२.प्रथमेश रामराव कुलकर्णी, वय -२१ वर्षे, व्यवसाय - शिक्षण,
रा. मारवाडी गल्ली , कुंडलवाडी, ता. बिलोली जि. नांदेड.
०३. मयुरेश रामराव कुलकर्णी, वय - १८ वर्षे, व्यवसाय - शिक्षण,
रा. मारवाडी गल्ली , कुंडलवाडी, ता. बिलोली जि. नांदेड.
०४. सुमनबाई भ्र. त्र्यंबकराव कुलकर्णी, वय - ७९ वर्षे,
रा. मारवाडी गल्ली , कुंडलवाडी, ता. बिलोली जि. नांदेड.

**विरुध्द**

गैरअर्जदार: निरंक

**विषय- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी अर्जदाराने मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदाराचे असे कथन आहे की, अर्जदार क्रमांक ०१ ते ०४ हे **मयत रामराव त्र्यंबकराव कुलकर्णी** यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराचे कथन आहे की, अर्जदार क्रमांक ०१ हि **मयत रामराव त्र्यंबकराव कुलकर्णी** यांची पत्नी असुन अर्जदार क्रमांक ०२ व ०३ हे मुले आहेत.अर्जदार क्रमांक ०४ हि **मयत रामराव त्र्यंबकराव कुलकर्णी** यांची आई आहे. **मयत रामराव त्र्यंबकराव कुलकर्णी** यांचा मृत्यू दिनांक ०२/०७/२०२० रोजी झाला . अर्जदार क्रमांक ०१ ते ०४ यांनी कथन केले आहे की, अर्जदार क्रमांक ०१ ते ०४ यांना **मयत रामराव त्र्यंबकराव कुलकर्णी** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदार यांनी मा. न्यायालयात **सदर मयत** यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील अर्जदार हे **सदर मयत** यांचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल अगर **सदर मयत** यांचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिरप्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे **सदर मयत** यांचे वारस असल्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू **सदर मयत** यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १२/०१/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून
क. लिपीक, सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर., बिलोली दिवाणी न्यायालय व. स्तर., बिलोली.



## टी.सी. हरवली

माझी प्रेम राहुल केळकर या नावाची १० वी पास ची टि.सी. हडको ते नांदेड प्रवासादरम्यान हरवली आहे , सापडल्यास खालील मोबाईल वर संपर्क साधावा.
- संपर्क -
मोबाईल नंबर
९०११०७६५४३



## टी.सी. हरवली

माझी इयत्ता ४थी पासची टी.सी. नांदेड ते परभणी रेल्वे प्रवासादरम्यान दि. ५/२/२०२६ रोजी हरवली आहे. तसेच इतर डाक्युमेंट असलेली फाईलसुद्धा हरवली आहे. फाईलमध्ये शंतनु शिवरूद्र सोनवणे या नावाचे सर्वच डाक्यमेंट होते. मला पुढच्या शिक्षणासाठी डाक्युमेंटची गरज आहे. तरी कोणाला फाईल सापडल्यास कृपया खालील नंबरवर संपर्क साधावा
**-: संपर्क पत्ता :-**
**शंतनु शिवरूद्र सोनवणे, मो.नं. ९३२१७८४१०१**



## Change In Name


My Old Name is Manam Begum Shaikh Imtiyaz which now I am changing as New Name Manam Begum Sk. Imtiyaz Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

Address -
Hamalpura, Nanded, Maharashtra
Mo.No. 8830705386



## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

रामबाण ईलाज
वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.
:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ७०६७७१९७०१, ९८६०७२१३५६

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षापासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकूण, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादीचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# नांदेड जिल्हा निर्यातीसाठी अग्रस्थानी नेणार - जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

## शासनाच्या सुविधांचा लाभ घेऊन 'लोकल टू ग्लोबल'चा मार्ग स्वीकारण्याचे उद्योजकांना आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)** - नांदेड जिल्ह्यात उपलब्ध दळणवळणाच्या भक्कम पायाभूत सुविधा तसेच कृषीवर आधारित उत्पादन क्षमता पाहता निर्यातीसाठी मोठ्या संधी उपलब्ध आहेत. उद्योजकांनी बाजारपेठेचे भान ठेवून भविष्यातील धोके ओळखावेत व केंद्र तसेच राज्य शासनाच्या विविध विभागांशी समन्वय साधून जिल्ह्यात निर्यातीस पोषक वातावरण निर्माण करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.

निर्यात हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून, शासनाच्या विविध सुविधा व योजनांचा लाभ घेऊन नांदेड जिल्ह्याला 'लोकल टू ग्लोबल' करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवन येथे शुक्रवारी महानिर्यात इग्नाईट कन्व्हेंशन २०२६ अंतर्गत आयोजित कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते झाले. या कार्यशाळेस जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अमोल इंगळे, डाक विभागाचे अधिकारी अक्षय कुलकर्णी, न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनीचे चांगदेव शेळके, महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे अधिकारी पी. डी. मुळे, जिल्हा अग्रणी बँक अधिकारी सोनकांबळे, ए. यू. स्मॉल फायनान्स बँकेचे व्यवस्थापक अमरजितसिंघ, भारतीय स्टेट बँकेचे अधिकारी सौरभ कुमार, नांदेड जिल्हा औद्योगिक संघटनेचे अध्यक्ष हर्षद शहा, आनंद बिडवई, निर्यातदार निलेश देशमुख तसेच निर्यातक्षम उद्योगांचे उद्योजक, नवउद्योजक व विविध शासकीय विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

नांदेड जिल्ह्यात जिल्हा निर्यात केंद्राची निर्मिती करणे व निर्यातीबाबत उद्योजकांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश असल्याचे जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अमोल इंगळे यांनी प्रास्ताविकात नमूद केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'लोकल टू ग्लोबल' या संकल्पनेच्या पूर्ततेसाठी केंद्र शासनाच्या डाक विभागामार्फत उपलब्ध असलेल्या डाक घर निर्यात केंद्र, डाक पोर्टल नोंदणी तसेच सुलभ व आधुनिक निर्यात प्रक्रियेबाबत अधिकारी अक्षय कुलकर्णी यांनी पॉवर पॉईंट सादरीकरणाद्वारे सविस्तर माहिती दिली. उद्योग व व्यापार सुलभतेच्या दृष्टीने मैत्री कक्ष अंतर्गत उद्योगांच्या अडचणी एकाच छताखाली सोडविण्याची व्यवस्था असल्याचे अधिकारी धनश्री जाधव व मनोज डोमाणे यांनी ऑनलाईन मार्गदर्शनातून स्पष्ट केले. उद्योग सुरू करण्यासाठी कर्जविषयक अडचणी, शासकीय योजनांचा लाभ व उद्योजकांनी सकारात्मक मानसिकतेने पुढे येण्याची आवश्यकता बँक अधिकाऱ्यांनी अधोरेखित केली.

केळी उत्पादन घटकाच्या संशोधन व निर्यात अनुभवाबाबत माहिती देताना निर्यातदार निलेश देशमुख यांनी निर्यातीतील अडचणी, त्यावरील उपाय तसेच ग्राहकांना गुणवत्तापूर्ण माल पुरविण्याचे महत्त्व स्पष्ट केले.

यावेळी उपस्थितांचे आभार व्यवस्थापक अनिल कदम यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा उद्योग केंद्राचे उद्योग निरीक्षक सतीशकुमार चव्हाण, अरविंद भांडे, सोमेश आठवले, एमसीईडी संस्थेचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मोलाचे योगदान दिले. या कार्यशाळेस सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग घटक, निर्यातदार, निर्यातक्षम व नवउद्योजक, औद्योगिक संस्था व संघटना, औद्योगिक समूह, शेतकरी सहकारी संस्था, प्रक्रिया उद्योग केंद्र, निर्यात प्रचालन समितीचे सदस्य, संशोधक तसेच बँका व विविध शासकीय यंत्रणांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ग्रामीण युवक, विद्यार्थी व उद्योजकांच्या नवकल्पनांना चालना देणारे महाराष्ट्र स्टार्टअप धोरण -डॉ. श्रीकांत पाटील



**नांदेड (प्रतिनिधी)** - ग्रामीण भागातील युवक-युवती, विद्यार्थी आणि उद्योजकांच्या नवकल्पनांना चालना देत नवउद्योजक घडविण्यावर महाराष्ट्र शासनाचा विशेष भर आहे. यासाठी स्टार्टअप परिसंस्था प्रत्येक जिल्हा व तालुक्यापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करीत असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. श्रीकांत पाटील यांनी केले.

स्टार्टअप इंडियाच्या दुसऱ्या दशकातील नव्या निर्णयांमुळे कृषी, ग्रामीण व डीप टेक क्षेत्रातील नवोपक्रमांना गती मिळणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

श्री गुरुगोविंदसिंघजी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, नांदेड येथे 'प्रादेशिक स्टार्टअप आणि नावीन्यपूर्ण संवाद' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त डॉ. पाटील मार्गदर्शन करताना बोलत होते.

यावेळी श्री गुरुगोविंदसिंघजी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग कॉलेजचे संचालक महेश कोकरे यांच्यासह स्टार्टअप्स, प्राध्यापक, उद्योग प्रतिनिधी तसेच प्रादेशिक नाविन्यपूर्ण परिसंस्थेतील विविध घटक यांची उपस्थिती होती.

डॉ. श्रीकांत पाटील यांनी सांगितले की, महाराष्ट्र स्टार्टअप धोरणाअंतर्गत राज्यातील स्टार्टअप परिसंस्थेला सर्वसमावेशक सहाय्य दिले जात आहे. स्टार्टअप परिसंस्था केवळ महानगरांपुरती मर्यादित न राहता ग्रामीण भागातील युवक, विद्यार्थी आणि स्थानिक उद्योजकांना संधी उपलब्ध करून देणे हे राज्याचे स्पष्ट धोरण असल्याचे त्यांनी नमूद केले. याच अनुषंगाने, स्टार्टअप इंडियाच्या दुसऱ्या दशकात प्रवेश करताना केंद्र सरकारने स्टार्टअप मान्यतेची चौकट अधिक सक्षम व भविष्याभिमुख केल्याचे डॉ. पाटील यांनी अधोरेखित केले. नव्या अधिसूचनेनुसार स्टार्टअपसाठी उलाढाल मर्यादा २०० कोटी रुपयांपर्यंत वाढवण्यात आली असून, डीप टेक स्टार्टअपसाठी स्वतंत्र श्रेणी निर्माण करून त्यांची वयोमर्यादा २० वर्षे आणि उलाढाल मर्यादा ३०० कोटी रुपयांपर्यंत निश्चित करण्यात आली आहे. तसेच सहकारी संस्थांनाही स्टार्टअप मान्यतेत समाविष्ट करून कृषी, ग्रामीण आणि समुदायाधारित नवोपक्रमांना नवे बळ देण्यात आले आहे. या धोरणामुळे येणाऱ्या काळात गाव समृद्ध होणार असून, यासाठी प्रत्येक गावपातळीवरील नवकल्पना देशपातळीवर न्यायची आहे. यासाठी महाविद्यालयाची भूमिका अत्यंत महत्वाची असल्याचे मत डॉ. श्रीकांत पाटील यांनी व्यक्त केले.



**नांदेड-** महापौर पदासाठी भाजप सह काँग्रेस-वंचित बहुजन आघाडी आणि 'एमआयएम'नेही महापौर, उपमहापौर पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. एमआयएम पक्षाकडून अश्विनी धोंगडे, तर काँग्रेस- वंचित कडून महेजबीन अब्दुल फहीम यांनी पाच अर्ज दाखल केले आहेत. तर उपमहापौर पदासाठी एमआयएमकडून सुमय्या अलकेसरी आणि काँग्रेस-वंचितकडून राहुल सोनसळे यांनी आपले नामनिर्देशन पत्र दाखल केले आहे. **(छाया : नरेंद्र गडप्पा, नांदेड)**

# खेळातून सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास साधता येतो -सदानंद पाटील

## मुलींच्या विभागीय झोनल क्रीडा स्पर्धेचे ग्रामीण टेक्निकल कॅम्पसमध्ये थाटात उद्घाटन

**नांदेड (प्रतिनिधी)** - खेळामुळे केवळ शारीरिक तंदुरुस्तीच नव्हे, तर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास घडतो, असे प्रतिपादन सेवानिवृत्त अप्पर आयुक्त सदानंद पाटील यांनी केले. ते ग्रामीण टेक्निकल अँड मॅनेजमेंट कॅम्पस, विष्णुपुरी येथे आयोजित मुलींच्या विभागीय झोनल क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

इंटर इंजिनिअरिंग डिप्लोमा स्टुडंट्स स्पोर्ट्स असोसिएशन (आयईडीएसएसए) यांच्या वतीने नांदेड, लातूर, हिंगोली व परभणी जिल्ह्यातील पॉलीटेक्निक तसेच डिप्लोमा फार्मसी महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी या वर्षीच्या विभागीय क्रीडा स्पर्धांच्या आयोजनाची जबाबदारी ग्रामीण टेक्निकल अँड मॅनेजमेंट कॅम्पस, विष्णुपुरी यांना देण्यात आली आहे. या स्पर्धा दिनांक ६ ते ८ फेब्रुवारी दरम्यान ग्रामीण कॅम्पसमध्ये आयोजित करण्यात आल्या आहेत.

स्पर्धांचे उद्घाटन गुरुवार, दिनांक ६ फेब्रुवारी रोजी उत्साहात पार पडले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त अप्पर आयुक्त सदानंद पाटील तसेच श्री गुरु गोबिंदसिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र महाविद्यालयाचे क्रीडा प्रभारी भास्कर कदम उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संकुल संचालक डॉ. विजय पवार होते.

यावेळी मार्गदर्शन करताना भास्कर कदम यांनी विद्यार्थिनींना स्पर्धेसाठी नव्हे, तर आयुष्य



जगण्यासाठी खेळा असा मौलिक संदेश दिला. खेळामुळे शिस्त, संघभावना, नेतृत्त्वगुण आणि आत्मविश्वास विकसित होतो, असे त्यांनी नमूद केले. या उद्घाटन समारंभास नांदेड, लातूर, हिंगोली व परभणी जिल्ह्यातील स्पर्धक विद्यार्थिनी, प्रशिक्षक, संघ व्यवस्थापक तसेच क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामीण कॅम्पस परिसरात क्रीडा स्पर्धांमुळे उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.


## नांदा सौख्यभरे

### धोत्रे-प्रभाकरण

**नांदेड** - येथील रहिवासी सौ. सूर्यकांता दत्ताहरी धोत्रे व दत्ताहरी नागोराव धोत्रे यांचे ज्येष्ठ चिरंजीव सुमितकुमार (आयपीएस) यांचा मंगल परिणय केरळ येथील रहिवासी पी. प्रभाकरण आणि रेमाबाई पी. यांची ज्येष्ठ कन्या लक्ष्मीप्रिया (आयआरएस) हिजसमवेत नुकताच संपन्न झाला. त्या प्रीत्यर्थ आज शनिवार, दि. ७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ वाजता नांदेड शहरातील ओम गार्डन येथे स्वागत समारंभ आयोजित केला आहे. वधू-वरांस हार्दिक शुभेच्छा!

**-संपादक**

# किनवटजवळ अपघात; डॉक्टर बहीण-भावासह चालक गंभीर



**किनवट (प्रतिनिधी)** - चंद्रपूर ते किनवट प्रवासादरम्यान शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी रोजी पहाटे किनवटपासून अवघ्या चार किलोमीटर अंतरावर असलेल्या घोटी येथे भरधाव कार रस्त्याखाली उतरून झालेल्या भीषण अपघातात डॉक्टर बहीण-भाऊ व वाहनचालक असे तिघेजण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर नागपूर येथे उपचार सुरू आहेत.

या अपघातात गोकुंदा येथील रहिवासी ज्येष्ठ नेते नारायण सिडाम यांचे नातवंड असलेले व माजी सैनिक अशोक आबाराव सिडाम यांची कन्या रत्नमाला अशोक सिडाम, त्यांचा मुलगा कुणाल अशोक सिडाम (दोघेही डॉक्टर) तसेच वाहनचालक अजय लदाडे हे तिघे जखमी झाले आहेत. किनवट येथील डॉ.कुणाल सिडाम यांच्या साखरपुड्याच्या कार्यक्रमासाठी कुटुंबीय गडचिरोली येथे गेले होते. कार्यक्रम आटोपून चंद्रपूरमार्गे किनवटकडे परतीचा प्रवास सुरू असताना शुक्रवारी पहाटे घोटी परिसरात वाहनचालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने कार रस्त्याखाली जावून जोरात आदळली. धडकेचा वेग इतका प्रचंड होता की, वाहनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. कारमधील तिघांनाही गंभीर दुखापती झाल्या. अपघाताची माहिती मिळताच स्थानिकांनी तातडीने मदतकार्य करत जखमींना उपचारासाठी आदिलाबाद येथे हलविले. मात्र, तिघांचीही प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी त्यांना नागपूर येथे पाठविण्यात आले.

# धर्माबाद शहरात ३२ तंबाखू विक्रेत्यांवर दंडात्मक कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)** -धर्माबाद शहरात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाची मोठ्या प्रमाणात विक्री होत असल्यामुळे २००३ च्या कायद्याचे उल्लंघन होत आहे. याप्रकरणी मिळालेल्या माहितीनुसार जिल्हास्तरीय तंबाखू नियंत्रण पथकाने ५ फेब्रुवारी २०२६ रोजी धर्माबाद शहरात विविध ठिकाणी अचानक धाडी टाकून एकूण ३२ तंबाखू विक्रेत्यांवर दंडात्मक कारवाई करून १३६०० रुपये दंड वसूल केला.

सदर कारवाई जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय पेरके, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. पांडुरंग पावडे व नोडल अधिकारी डॉ. हनमंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या पथकात जिल्हा सल्लागार डॉ. शितल चातुरे, डॉ. संजीवनी जाधव, डेंटल सर्जन डॉ. म्याकलवर, मानसशास्त्रज्ञ प्रकाश आहेर, सामाजिक कार्यकर्ते बालाजी गायकवाड, एमजीवीएसचे मंगेश गायकवाड, समुपदेशक नितीन आडे व दंत सहायक रमेश जक्कावाड तसेच धर्माबाद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सदाशिव भडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली



पोलीस कॉन्स्टेबल एफ. ए. सय्यद व ए. एस. कदम उपस्थित होते. सार्वजनिक ठिकाणी तसेच शैक्षणिक अथवा शासकीय, निमशासकीय कार्यालयाच्या परिसरात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाची विक्री अथवा सेवन किंवा साठवण होत असल्यास जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्ष, जिल्हा रुग्णालय नांदेड येथे तक्रार नोंदवून नांदेड जिल्हा तंबाखू मुक्त करण्याच्या या अभियानास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके यांनी केले आहे.



**नांदेड-**शिवसेना जिल्हा प्रवक्तापदी सुशीलकुमार भीमसिंह चव्हाण यांची तर शिवसेना महिला आघाडी शहर प्रमुखपदी श्रद्धा चव्हाण यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना नियुक्तीपत्र देताना आ. बालाजीराव कल्याणकर व शिवसेना जिल्हाप्रमुख गंगाधर बडुरे शेजारी सरपंच संघटनेचे जिल्हाध्यक्ष नारायण कदम, संतोष भारसावडे, निता राठोड, सुनिल राणे, उमेश माळगे आदी.
**(छायाचित्र-ज्ञानेश्वर सुनेगावकर, नांदेड)**

# सोन्याच्या बिस्किटाचे आमीष दाखवून ६० हजारांना गंडविले

**नांदेड (प्रतिनिधी)**- नायगाव शहरातील जनावरांच्या दवाखान्याच्या बाजूस सोन्याचे बिस्किट देतो म्हणून बतावणी करून ६० हजारांचे दागिने लंपास केल्याप्रकरणी एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर घटना ६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी घडली.

नायगाव येथील जनावरांच्या दवाखान्याजवळ गोवर्धन गणपती गोरे रा. वाकनपूर जि. बीड यांनी सोन्याचे बिस्कीट देतो अशी बतावणी करून बाजूला नेऊन गळ्यातील सोन्याचे चंपूल, कानातील दागिने किंमत ६० हजार लंपास केले. या प्रकरणी निर्मलाबाई बालाजी अभंगे यांनी दिलेल्या तक्रारीवरून नायगाव पोलीस ठाण्यामध्ये एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचा पुढील तपास हवालदार सांगवीकर हे करीत आहेत.

# 'मागेल त्याला सौर कृषिपंप' योजनेंतर्गत २४२१४ कृषीपंप बसविले; दिवसाच्या कालावधीत सिंचनाची सोय उपलब्ध

**नांदेड (प्रतिनिधी)** - 'मागेल त्याला सौर कृषिपंप' योजना राज्य सरकारची महत्त्वाकांक्षी योजना आहे. महावितरणतर्फे राबविण्यात येत असलेल्या या योजनेची नांदेड परिमंडळातही प्रभावी अंमलबजावणी सुरू असून, जानेवारी २०२६ पर्यंतच्या तपशीलानुसार नांदेड, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यांत २४२१४ सौर कृषीपंप बसविण्यात आले आहेत. या वाहिनीविरहित योजनेमुळे केवळ दिवसाच्या कालावधीतच शेतकऱ्यांना सिंचनाची सोय उपलब्ध झाली आहे.

'मागेल त्याला सौर कृषिपंप' योजनेआधी राज्यात महावितरणतर्फे 'कुसुम-ब' या नावाने वाहिनीविरहित सौर कृषीपंप योजना राबविण्यात आली. त्या जुन्या योजनेतील सौर कृषीपंप वगळून 'मागेल त्याला सौर कृषिपंप' योजनेत नांदेड जिल्ह्यात २९६६, परभणी जिल्ह्यात १३,१७८ तर हिंगोली जिल्ह्यात ८०७० सौर कृषीपंप शेतकऱ्यांच्या शेतात बसविण्यात आले आहेत.

'मागेल त्याला सौर कृषिपंप' या योजनेत शेतकऱ्यांना प्रधानमंत्री कुसुम योजनेच्या अंतर्गत केंद्र सरकारकडून ३० टक्के तर राज्य सरकारकडून ६० टक्के अनुदान मिळते. त्यामुळे केवळ दहा टक्के रक्कम भरून सिंचनासाठी कृषिपंपासह संपूर्ण संच मिळतो. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांना केवळ ५ टक्के लाभार्थी हिस्सा भरावा लागतो. या योजनेमुळे कृषिपंपासाठी पैसे भरून वीज जोडणीची प्रतीक्षा करणाऱ्या सर्व शेतकऱ्यांचा 'पेड पेंडिंग'चा प्रश्न सुटणार आहे.

'मागेल त्याला सौर कृषिपंप' योजनेसाठी महावितरणने स्वतंत्र पोर्टलची निर्मिती केलेली आहे. शेतकऱ्यांनी पंपासाठी ऑनलाईन नोंदणी केल्यानंतर महावितरणकडून अर्ज मंजूर केला जातो. त्यानंतर शेतकऱ्याने त्याचा हिस्सा भरायचा असतो. शेतकऱ्याकडून पंप बसविण्यासाठी एजन्सीची निवड केली जाते. पंप बसविण्याच्या ठिकाणाची महावितरण, एजन्सी व शेतकरी अशी तिघांकडून संयुक्त पाहणी केली जाते, त्यानंतर कार्यादेश एजन्सीला दिला जातो आणि शेतात पंप बसविला जातो. पंप बसविणाऱ्या एजन्सीवर पुढच्या काळात देखभाल दुरुस्तीचीही जबाबदारी आहे. सौर पॅनल्समधून २५ वर्षे वीजनिर्मिती होत असल्याने तेवढा काळ शेतकऱ्यांना कृषिपंपाचे वीजबिल येत नाही. हे पंप पारंपरिक वीजपुरवठ्यावर अवलंबून नसल्याने शेतकऱ्यांना त्यांच्या मर्जीप्रमाणे दिवसा कधीही सिंचन करता येते. त्यामुळे दिवसा वीजपुरवठ्याची शेतकऱ्यांची मागणी पूर्ण होते. त्यामुळे अधिकाधिक शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन महावितरणतर्फे करण्यात येत आहे.

## सौ. संगीता भालेराव यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)** - येथील यूपीपी पैनगंगा प्रकल्पाचे सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता प्रल्हादराव भालेराव यांच्या पत्नी सौ. संगीता भालेराव यांचे दि. ५ फेब्रुवारी रोजी रात्री पुणे येथे निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर ६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी नांदेड येथे गोवर्धन घाटावर अंत्यसंस्कार करण्यात आले. सौ. संगीता भालेराव ह्या सध्या भारतीय जनता पक्षात सक्रिय होत्या.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४
ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com